रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २८३
www.ramprahar.com

◆ शनिवार, २ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून सीएम फडणवीसांचे कौतुक/२

माथेरान घाटरस्त्यात पुन्हा बिबट्याचे दर्शन/५

कर्जतमधील ४३ तायक्वांदो खेळाडूंना 'यलो बेल्ट'/८

## बारावीच्या परीक्षेचा आज निकाल; विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता




**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल शनिवारी (दि.२) दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. यंदा राज्यभरात सुमारे १४.१७ लाख विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. विद्यार्थ्यांना आपला निकाल https://mahahsscboard.in, https://results.digilocker.gov.in, https://hscresult.mkcl.org, https://results.targetpublications.org, https://results.navneet.com या संकेतस्थळांवर पाहता येणार आहे. निकालाबाबत काही शंका असल्यास ३ ते १७ मे या कालावधीत गुणपडताळणी तसेच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीसाठी ऑनलाइन अर्ज करता येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा, असे शिक्षण मंडळाने स्पष्ट केले आहे.

### महाराष्ट्राच्या वेगवान विकासाचा नवा अध्याय खुला

# मिसिंग लिंक नव्हे; तर कनेक्टिंग लिंक!





**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' हा केवळ एक रस्ता नसून भारतीय अभियांत्रिकी कौशल्याचा जागतिक स्तरावरील अजोड नमुना आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवासाचा वेळच वाचणार नाही, तर तो राज्याच्या अर्थव्यवस्थेला ७० हजार कोटींची गती देणारा 'इकॉनॉमिक मल्टिप्लायर' ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.१) येथे केले.

या प्रकल्पास मिसिंग लिंकपेक्षा 'कनेक्टिंग लिंक' संबोधणे जास्त संयुक्तिक असल्याचे सांगून या प्रकल्पाच्या लोकार्पणानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाच्या तांत्रिक आणि सुरक्षिततेच्या पैलूंवर विशेष प्रकाश टाकला.

या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमीमंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार सुनील तटकरे व श्रीरंग बारणे, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, एमएसआरडीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, एमएसआरडीसीचे इतर अधिकारी तसेच या प्रकल्पांतर्गत बोगद्याच्या बांधकामातील सहभागी नवयुगा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रकल्पाबाबत माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून तांत्रिकदृष्ट्या हा मार्ग अत्यंत प्रगत आहे. यामध्ये अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा, वॉटर मिस्ट सिस्टीम आणि दर ५० मीटरवर आपत्कालीन दूरध्वनीची सोय करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

सुरक्षेचा विशेष उपाय म्हणून दर ३०० मीटरवर दोन्ही बोगद्यांना जोडणारे 'कनेक्टर्स' तयार करण्यात आले आहेत, जेणेकरून एखाद्या बोगद्यात दुर्घटना घडल्यास दुसऱ्या बोगद्यातून प्रवाशांचे सुरक्षित स्थलांतर करता येईल. संपूर्ण मार्गावर २४ तास सीसीटीव्हीची देखरेख असून लेनची शिस्त पाळली जावी यासाठी 'इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' कार्यान्वित करण्यात आली आहे. नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना आता थेट त्यांच्या घरामध्ये ई-चलन पाठवले जाईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

अतिशय कठीण भौगोलिक परिस्थितीत, दऱ्याखोऱ्यांत आणि जंगलांमध्ये यंत्रसामुग्री नेऊन हे काम पूर्ण करणे मोठे आव्हान होते, असे सांगताना मुख्यमंत्र्यांनी या कामात योगदान देणाऱ्या सात देशांतील तज्ज्ञ संस्थांचे आणि कंपन्यांचे आभार मानले.

कोविडच्या काळात आलेल्या अडचणींवर मात करत महायुती सरकारने या कामाला गती दिली आणि आज सात हजार १८१ कोटी रुपयांचा हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. या प्रकल्पामुळे खोपोली ते कुसगावदरम्यानचे अंतर सहा किलोमीटरने कमी होणार असून प्रवाशांचा किमान २५ ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे.

विशेष म्हणजे हा प्रकल्प ज्या उंबरखिंडीच्या परिसरात साकारला आहे, तिथेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी मुघलांचा पराभव केला होता, या ऐतिहासिक संदर्भाची आठवणही मुख्यमंत्र्यांनी करून दिली. (पान २ वर..)

### गिनीज बुक रेकॉर्डमध्ये नोंद

मिसिंग लिंक हा प्रकल्प आधुनिक अभियांत्रिकीचा एक अद्भुत नमूना मानला जात आहे. यातील २३.५ मीटर रूंदीचा बोगदा आहे, ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. हा जगातील सर्वात रूंद बोगदा लोणावळा तलावाच्या चक्क १८० मीटर खालून खोदण्यात आला आहे. याशिवाय जगातील सर्वात उंच केबलस्टेड पूल येथे तयार केला गेला असून त्याची उंची १८२ मीटर आहे. नदीवर उभारलेला हा पूल अभियांत्रिकी चमत्कार आहे.

### ...अन् वाहतूक कोंडी फुटली!

सलग सुटट्यांमुळे शुक्रवारी सकाळपासूनच पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांच्या रांगा मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर लागल्या होत्या. त्यामुळे बोरघाट, अमृतांजन टप्पा पूर्णपणे ठप्प झाला. घाटामध्ये २००च्या आसपास हलकी वाहन इंजिन गरम झाल्याने बंद पडल्याने वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली. या कोंडीतून वाहनचालक आणि प्रवाशांची सुटका व्हावी यासाठी यंत्रणेने पुण्याकडे जाणारी मिसिंग लिंक लेन खुली केली. त्यामुळे काही वेळातच वाहतूक कोंडी फुटल्याचे दिसून आले.



पनवेल : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७वा वर्धापन दिन शुक्रवारी सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पनवेल तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी त्यांनी तिरंग्याला सलामी देत उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला प्रांत अधिकारी पवन चांडक, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, तहसीलदार मीनल भोसले भामरे, उपसभापती भूपेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वैशाली सावंत यांच्यासह इतर मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## पनवेलमध्ये स्वगणनेला प्रारंभ

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली स्वतःची नोंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



केंद्र सरकारच्या जनगणना उपक्रमांतर्गत सुरू असलेल्या स्वगणना मोहिमेला महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि.१) पनवेलमध्ये उत्साहात प्रारंभ झाला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतःची जनगणना करून या उपक्रमाची सुरुवात केली.

या कार्यक्रमाला प्रांत अधिकारी पवन चांडक, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, तहसीलदार मीनल भोसले भामरे, उपसभापती भूपेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वैशाली सावंत यांच्यासह इतर अधिकारी व नागरिक उपस्थित होते. जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा स्वगणना स्वरूपात असून ही प्रक्रिया नागरिकांसाठी सुलभ, सोपी आणि सुरक्षित डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपक्रमाद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण करत आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. सर्व नागरिकांनीही स्वगणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## निवडक

### नर्मदा नदीत बोट उलटून नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू

**भोपाळ** : मध्य प्रदेशातील बरगी धरणाजवळ नर्मदा नदीत गुरुवारी पर्यटकांनी भरलेली एक बोट वादळी वाऱ्यामुळे नदीत उलटली. या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला असून शुक्रवारी (दि.१) बचाव पथकाला एका आई आणि तिच्या चार वर्षांच्या मुलाचा मृतदेह एकत्र सापडला. प्रशासनाने आतापर्यंत २४ जणांना सुखरूप बाहेर काढले आहे. त्यापैकी १७ जणांवर उपचार सुरू आहेत, तर नऊ जण बेपत्ता असून त्यात पाच बालकांचा समावेश आहे.

### पश्चिम बंगालमध्ये १५ केंद्रांवर आज फेरमतदान

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान बुधवारी पार पडले, पण दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील डायमंड हार्बर आणि मगराहत पश्चिम विधानसभा मतदारसंघांतील १५ मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन छेडछाड आणि गैरप्रकार झाल्याच्या आरोपानंतर फेरमतदान घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले. त्यानुसार शनिवारी (दि.२) मतदान होणार आहे.

## 'बलिदानातून घडलेले महाराष्ट्र राज्य विकासाचे ग्रोथ इंजिन'



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.१) हुतात्मा चौक येथे हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र ही जगातील ३०व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याचे सांगून बलिदानातून घडलेले महाराष्ट्र राज्य आज देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## गव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चा

### शिवरायांच्या पुतळ्याच्या जागेला अवास्तव दर आकारणीस ठाम विरोध




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायतीत महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित ग्रामसभा शुक्रवारी (दि.१) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. या ग्रामसभेत गावच्या विकासाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहणानंतर ग्रामसभा झाली. या ग्रामसभेला पदाधिकारी, अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत मागील ग्रामसभेचे इतिवृत्त वाचन करून ते कायम करण्यात आले तसेच शासनाकडील परिपत्रकांचे वाचन करण्यात आले. सन २०२६-२७साठी कर आकारणी (डिमांड) मंजूर करण्यात आली. ग्रामस्थांकडून आलेल्या विविध अर्जांवरही चर्चा करून आवश्यक निर्णय घेण्यात आले.

उलवे नोड सेक्टर १२मधील प्लॉट क्र. ४वर प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीच्या विषयावर ग्रामसभेत जोरदार चर्चा झाली. सिडको या जागेसाठी आकारत असलेले पाच कोटी ३४ लाख रुपये देण्यास ग्रामस्थांनी ठाम विरोध करत एकमताने ठराव मंजूर केला. यापूर्वी इतर सामाजिक व धार्मिक संस्थांना नाममात्र एक रुपया दराने जागा देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर शिवरायांच्या पुतळ्यासाठी असलेल्या जागेला तसेच रामशेठ ठाकूर मैदानालाही एक रुपया दर लागू करावा, अशी मागणी ग्रामसभेत करण्यात आली. या संदर्भात ग्रामपंचायतीमार्फत सिडकोला अधिकृत पत्र पाठवण्याचा निर्णयही घेण्यात आला. त्याचप्रमाणे प्लॉट क्र.४ व प्लेग्राऊंड प्लॉट क्र. ६ या जागांसाठी कंपाऊंड उभारणीबाबत सिडकोकडे पत्राद्वारे कळवण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी या दोन्ही विषयांवर एकमताने ठराव संमत केला.

या ग्रामसभेला ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, (पान २ वर..)

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त गव्हाण येथे ग्रामस्वच्छता मोहीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याची सुरुवात शुक्रवारी (दि.१) गव्हाण ग्रामपंचायत हद्दीत ग्रामस्वच्छता मोहिमेद्वारे झाली.

या स्वच्छता मोहिमेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्व. भगतसाहेबांनी गव्हाणसह पनवेल तालुक्यात सामाजिक कार्याचा ठसा उमटवला होता. त्यांच्या ७ मे या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून गव्हाण गव्हाण ग्रामपंचायत हद्दीत ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी उद्योजक वैभव देशमुख यांच्या वतीने येथील ग्रामपंचायतीला घंटागाडी भेट देण्यात आली. या घंटागाडीचे लोकार्पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या मोहिमेवेळी पंचायत समिती जिज्ञासा कोळी, माजी सदस्य हरिभाऊ पाटील, रत्नप्रभा गव्हाण, माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, हेमंत ठाकूर, अजय भगत, विश्वनाथ कोळी, वसंत म्हात्रे, हेमंत पाटील, अमृत भगत यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, स्व. भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त पुढील काही दिवसांत विविध सामाजिक, सांस्कृतिक व लोकहिताचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## नेरळमध्ये तरुणाचा रस्त्यावर कोसळून मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

वाढत्या तापमानाने नागरिक हैराण झाले असताना नेरळ परिसरात गुरुवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. खांडा येथे २६ वर्षीय तरुणाचा रस्त्यावर चालताना अचानक चक्कर येऊन मृत्यू झाला.

मृत तरुणाचे नाव शकील साबीर खान असे असून तो मूळचा उत्तर प्रदेशमधील रहिवासी होता. सध्या तो नेरळमधील मोहाचीवाडी येथे वास्तव्य करून शोरमा विक्रीद्वारे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असे. गुरुवारी दुपारी सुमारे १२च्या सुमारास शकील हा खांडा येथून पायी जात असताना अचानक चक्कर येऊन रस्त्यावर कोसळला. स्थानिक तरुणांनी त्याला उचलून जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. यानंतर मृतदेह नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आला. प्राथमिक तपासणीत डॉक्टरांनी शकीलचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाल्याचे स्पष्ट केले.

## सलग सुट्ट्यांमुळे रायगडात वाहतूक कोंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाला लागून आलेल्या सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे पर्यटक शुक्रवारी (दि.१) मोठ्या संख्येने फिरण्यासाठी बाहेर पडले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातून जाणारा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-पुणे जुना महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.



पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वे आणि मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाट परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. खालापूर टोलनाका परिसर आणि अमृतांजन पूल परिसरात वाहतूक अतिशय धिम्या गतीने सुरू होती. एकाच वेळी हजारो वाहने महामार्गावर आल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. मिसिंग लिंक प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यासाठी महामार्गावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तरीही वाहतूक नियमन करणे कठीण झाले होते.

महाराष्ट्र दिन, त्यानंतर शनिवार व रविवार अशा सलग तीन दिवसांच्या सुट्ट्या आणि मे महिन्याच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक कोकणाच्या दिशेने निघाले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरही मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. कोलाड, इंदापूर, माणगाव, नागोठणे परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले. एकीकडे उन्हाच्या झळा, तर दुसरीकडे वाहने भरउन्हात उभी अशा दुहेरी कोंडीत प्रवासी सापडले. याचा सर्वाधिक त्रास महिला आणि लहान मुलांना करावा लागला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे कौतुक

## ‘विकसित भारता’च्या ध्येयपूर्तीसाठी ‘विकसित महाराष्ट्रा’ची जोड ठरणार महत्त्वपूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

‘विकसित भारत २०४७’ च्या ध्येयपूर्तीसाठी ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ ची जोड महत्वपूर्ण ठरणार आहे. ‘विकसित भारत’चे स्वप्न साकारताना महाराष्ट्र महत्वपूर्ण सहभाग देत असल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.



(संग्रहित छायाचित्र)

महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक योगदानाची प्रशंसा करत केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला भक्कम पाठबळ देण्याची ग्वाही दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र हा देशाच्या नागरी संस्कृतीचा प्रेरणास्रोत राहिला आहे. शौर्य, समाजसुधारणा आणि राष्ट्र उभारणीची परंपरा येथे खोलवर रुजलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य संकल्पनेपासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांपर्यंत महाराष्ट्राने देशाला दिशा दिली आहे. महाराष्ट्राला लोकमान्य टिळक, वीर सावरकर आणि संत परंपरेचे योगदान असल्याचे सांगून त्यांनी राज्याच्या ऐतिहासिक परंपरेचा गौरव केला आहे.

यंदाचे वर्ष महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचे नमूद करत प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती, महात्मा फुले यांची २०० वी जयंती, संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती, महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष तसेच बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीचे वर्ष आहे. राज्य सरकारने हे वर्ष ‘समता आणि सामाजिक समरसता वर्ष’ म्हणून साजरे करण्याचा घेतलेल्या निर्णयाबद्दल त्यांनी समाधानही व्यक्त केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीन महत्त्वाच्या बाबींचा विशेष उल्लेख केला. मराठा साम्राज्याशी संबंधित महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा युनेस्को जागतिक वारसा यादीत समावेश, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा अभिमान आणि पॅरिस येथील युनेस्को मुख्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण या घटनांनी महाराष्ट्राचा जागतिक स्तरावर सन्मान वाढल्याचे त्यांनी नमूद केले.

आर्थिक क्षेत्रात महाराष्ट्राच्या योगदानाचे कौतुक करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बिडकीन येथील औद्योगिक क्षेत्र उद्योग आणि नवोन्मेषाचे भविष्यवेधी केंद्र म्हणून उदयास येत आहे. सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी २४ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचा उल्लेख करत मुंबई मेट्रो ‘अॅक्वा लाईन’ विस्तार, नवी मुंबई विमानतळ, वाढवण बंदर आणि शक्तीपीठ महामार्ग यांसारख्या प्रकल्पांमुळे विकासाला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. डेटा सेंटर, डिजिटल पायाभूत सुविधा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान या क्षेत्रात महाराष्ट्र आपले नेतृत्व कायम ठेवत आहे. मुंबई हे चित्रपट आणि सर्जनशील उद्योगाचे केंद्रस्थान असून ही ऑरेंज इकॉनॉमी मजबूत करण्यात महाराष्ट्र एका आधारस्तंभाची भूमिका बजावत राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.

गडचिरोलीसारख्या पूर्वी मागासलेल्या भागात होत असलेल्या गुंतवणुकीचे महत्त्व अधोरेखित करीत तेथील बदल ‘नव्या विकास पर्वाची सुरुवात’ असल्याचे प्रधानमंत्री यांनी नमूद केले आहे. तसेच मराठवाड्यातील पाणी प्रकल्पांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचेही कौतुक केले.

# बिरवाडीत कारच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

महाड् तालुक्यातील बिरवाडी या औद्योगिक वसाहती मधील वर्दळीच्या शहरांमध्ये वॅगनार ची मोटर सायकल धडक लागून झालेल्या अपघातात मोटरसायकल चालत गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे या प्रकरणी पुष्करणीभूत ठरलेल्या व्हॅगनार चालकास पोलिसांनी अटक केली आहे.



महाड तालुक्यातील बिरवाडी एमआयडीसी रस्त्यावर अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून मागील एक महिन्यापासून या रस्त्यावर पाच अपघाताच्या घटना घडल्या आहेत. सर्व अपघात भीषण असून या वेगवेगळ्या अपघातामध्ये पाच तरुण कामगारांचा मृत्यू झाला आहे. दिनांक २८ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास बिरवाडी गावचे हद्दीतील एमआयडीसी रोडवरील आनंद दिघे विद्यालय समोर दुचाकी व वॅगनार कारचा अपघात होऊन यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दत्ताराम पांडुरंग भालेकर वय ४५ सध्या राहणार ग्रीन पार्क,नवे नगर महाड, मूळ राहणार सवाने तालुका महाड असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव असून मयत दत्ताराम भालेकर हे आपल्या ताब्यातील बजाज प्लेटिना मोटरसायकल घेऊन जात असताना आरोपी संजय शंकर जाधव याने आपल्या ताब्यातील वॅगनार कार चालवीत असताना एका अज्ञात ट्रकला अती वेगाने ओव्हरटॅक करून समोर येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की यामध्ये दूचाकी स्वार गंभीर जखमी झाले. जखमी झाल्याने जवळच्या महाड ग्रामीण रुग्णालय येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. परंतु जखम गंभीर असल्यामुळे त्यांचा रुग्णालयात मृत्यू झाला

. मागील एकाच महिन्यात बिरवाडी ते अतीरिक्त एमआयडीसी रस्त्यावर अपघात होऊन पाच जणांचा मृत्यू झाला आहे. सदरचा रस्ता हा नादुरुस्ती असून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून दुचाकी स्वार पडून अपघात होत आहेत. अनेक तक्रारी करून देखील एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता देशमुख संबंधित घटनेकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. लवकरात लवकर या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे आरोपी संजय शंकर जाधव यांचे विरोधात भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ) १२५(ब),३२४ (४), १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पवार या अपघाताचा अधिक तपास करीत आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा सक्षमतेने जागर –महापौर नितीन पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला गौरवशाली विचारांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपण सक्षमतेने पोहोचवत आहोत,असे प्रतिपादन महापौर नितीन पाटील यांनी आज येथे केले. पनवेल महानगरपालिकेच्यावतीने बुद्‌ध पौर्णिमा ,महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनानिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.




महापौर पुढे म्हणाले, निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर विद्यार्थ्यांच्या मार्फत होत आहे. त्यांचे विचार युवा पिढीपर्यंत जात आहेत ही महत्त्वाची बाब आहे. सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून त्यांनी पनवेलकर नागरिकांना महाराष्ट्र दिन व कामगार दिन तसेच बुद्‌ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते अॅड प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महापालिका सदस्य , अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, सहायक संचालक (नगर रचना) केशव शिंदे,उपायुक्त डॉ वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता संजय कटेकर,सहायक आयुक्त डॉ.रुपाली माने, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ राजू पाटोदकर उपस्थित होते.

आपल्या प्रास्ताविकात सभागृह नेते प्रकाश बिनेदार म्हणाले, पनवेलच्या इतिहासात पहिल्यांदाच यावेळी महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यासाठी श्री. बिनेदार यांनी महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे तसेच मनपा प्रशासनाचे आभार मानले .

यावेळी 'प्रिय अमुचा महाराष्ट्र' या सांस्कृतिक कार्यक्रमात ५१ कलाकारांच्या संचाद्‌वारे 'महाकलाविष्कार' सादर करण्यात आला.

# कलोते ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर यांनी बालविवाह रोखला

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत कलोते चे ग्राम पंचायत अधिकारी निलेश म्हसकर यांनी खालापूर पोलीस, बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि बाल संरक्षण अधिकारी यांच्या समवेत कांढरोली येथील बाल विवाह रोखला.



खालापूर तालुक्यातील कलोते ग्रा. पं. हद्दीतील कांढरोली तर्फे वनखल वाडी येथील कु. रेणुका सुनिल पवार वय वर्ष १७ हिचा विवाह मोठे वेणगाव ता. कर्जत या ठिकाणी होणार होता तसेच विणेगाव दांडवाडी येथील कु. तुषार तुकाराम पवार वय वर्ष २० वर्ष ६ महिने याचा विवाह विणेगाव बापदेव वाडी येथे विवाह संपन्न होणार होता परंतु हळदी सभारंभाचे दिवशी दोन्ही ठिकाणचे बालविवाह रोखून धरले, दोन्ही पालकांचे समुपदेशन करणेत आले.

यावेळी पथकासोबत दिप्ती रामरामे सरंक्षण अधिकारी खालापूर, महिला व बाल विकास अधिकारी संघमित्रा अंधोरिकर, ग्राम पंचायत अधिकारी निलेश म्हसकर, पोलीस हवालदार बबन धुळे, आदिती मोरे अंगणवाडी सेविका विणेगाव, श्रीम.लता पपेंद्र हिलम अंगणवाडी सेविका कांढरोली तर्फे वनखल वाडी, श्री. गणेश राजेंद्र दळवी पोलीस पाटील यांनी कार्यवाही केली.

यावेळी दोन्ही कुटुंबीयाचे व आदिवासी समाजाचे बाल कल्याण समितीचे अध्यक्ष जगन्नाथ साळुंखे यांनी समुपदेशन केले.अल्पवयीन मुलगा कु. तुषार तुकाराम पवार यांना बाल कल्याण समिती समोर हजर करणेत आले. खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी बाल विवाह रोखण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले असून, बाल विवाह रोखण्यासाठी, जनजागृती करण्याचे सूचित केले आहे.

## अपर जिल्हाधिकारी सुचिता भिकानेंच्या हस्ते महापारेषणमध्ये ध्वजवंदन

**मुंबई : प्रातिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते महापारेषणच्या वांद्रे येथील सांघिक कार्यालयाच्या प्रकाशगंगा इमारतीत राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी महापारेषणच्या वतीने राष्ट्रगान, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्य अभियंता जुईली वाघ, अमित नाईक, अधीक्षक अभियंता सचिन खडगी, उपस्थित होते.

पान १ वरुन

## मिसिंग लिंक नव्हे; तर कनेक्टिंग लिंक!

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्या मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी संदर्भातील व्हिडीओचा संदर्भ देत त्यांची व नागरिकांची दिलगिरी व्यक्त केली. "सुप्रियाताई, तुम्ही आज शेवटच्यांदा वाहतूक कोंडीत अडकलात, आता ‘मिसिंग लिंक’ सुरू झाल्यामुळे यापुढे तुम्हाला किंवा इतर कोणत्याही प्रवाशाला घाटात ट्रॅफिकमध्ये अडकण्याची वेळ येणार नाही,’ असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले तसेच कामगार दिनाचे औचित्य साधत त्यांनी या प्रकल्पासाठी घाम गाळणाऱ्या सर्व कामगारांचे आणि एमएसआरडीसीच्या चमूचे कौतुक केले. या ‘कनेक्टिंग लिंक’मुळे मुंबई-पुणे हा नॉलेज आणि टेक्नॉलॉजी कॉरिडॉर अधिक सक्षम होऊन राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळेल, असा विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पाच्या यशामध्ये सर्व स्तरावरील योगदानाचा आवर्जून उल्लेख केला. मध्यंतरीच्या काळात या कामाचा वेग मंदावला होता, परंतु चार वर्षांपूर्वी झालेल्या ‘अभियांत्रिकी आणि राजकीय चमत्कारा’मुळे पुन्हा एकदा या प्रकल्पाला गती मिळाली आणि सर्व अडचणी दूर झाल्या, असे सांगून हे सर्वसामान्यांचे सरकार असून जनतेने महायुतीला नेहमीच आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे लोकोपयोगी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात या प्रकल्पाच्या जागतिक विक्रमावर विशेष भर दिला. या प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेला २३.५ मीटर रुंदीचा बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगदा ठरला असून त्याची ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स’मध्ये नोंद झाली आहे, ही बाब महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकल्पाच्या नियोजनात उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांचेही मोठे योगदान असून त्यांनी अर्थसंकल्पात केलेली घोषणा आणि वेळोवेळी घेतलेला आढावा यामुळे हा प्रकल्प मार्गी लागल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

## ‘बलिदानातून घडलेले महाराष्ट्र राज्य विकासाचे ग्रोथ इंजिन’

‘दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा’ या महाराष्ट्र गीतातील ओळींचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. महाराष्ट्र दिन हा प्रत्येकासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

कामगार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामगारांना शुभेच्छा दिल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा उल्लेख करत ‘पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर नाही, तर कामगाराच्या तळहातावर असते,’ असे सांगून कामगारांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले.

राज्याच्या तसेच देशाच्या प्रगतीत कामगारांचा मोठा वाटा असून त्यांच्या श्रमांमुळेच संपन्नतेची उभारणी झाली आहे, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व कामगारांना अभिवादन केले.

## गव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चा

माजी सदस्य हरिभाऊ पाटील, रत्नप्रभा घरत, माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, हेमंत ठाकूर, अजय भगत, विश्वनाथ कोळी, वसंत म्हात्रे, हेमंत पाटील, वैभव देशमुख, अमृत भगत आदी उपस्थित होते. ग्रामसभेत ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेत गावच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याची भूमिका मांडली. यावेळी अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी आलेल्या विषयांवरही चर्चा करण्यात आली.

# महाड नगर परिषदेचा धडाका; करवसुली ६३.४७ टक्क्यांवर

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड नगर परिषदेच्या सन २०२५२६ या आर्थिक वर्षातील करवसुलीचा आढावा घेतला असता एकूण ६३.४७ टक्के वसुली नोंदविण्यात आली असून, गतवर्षीच्या तुलनेत ७.१९ टक्क्यांनी वाढ झाल्याचे अधिकृत आकडेवारीवरून स्पष्ट होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुलात वाढ करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने राबविलेल्या उपाययोजनांना यंदा अपेक्षित यश मिळाल्याचे दिसून येत आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील मालमत्ताधारकांची संख्या गतवर्षीच्या सुमारे १३ हजारांवरून यंदा १५ हजारांच्या आसपास पोहोचली आहे. नव्या नोंदींचा समावेश, तसेच प्रलंबित प्रकरणांची पूर्तता यामुळे कर आधार वाढण्यास मदत झाली आहे. २ डिसेंबर २०२५ रोजी नगरपरिषद निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर करवसुलीत लक्षणीय वेग आला.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान इच्छुक उमेदवार, त्यांचे कुटुंबीय व समर्थक यांनी कोणतीही थकबाकी राहू नये या उद्देशाने मोठ्या प्रमाणात कर भरणा केला. परिणामी, अल्प कालावधीतच सुमारे ७० लाख रुपयांची एकरकमी करवसुली झाली, असे प्रशासनाने नमूद केले आहे.

## अभय योजनेचा चांगला परिणाम



महत्त्वाचे म्हणजे, काही वर्षांपासून प्रलंबित असलेली दुबार मालमत्ता नोंदणीची समस्या यंदा प्राधान्याने सोडविण्यात आली. संबंधित मालमत्ता धारकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पंचनामा,पडताळणी व शहानिशा करून एकाच मालमत्तेवर दोनदा आकारला जाणारा कर दुरुस्त करण्यात आला.या प्रक्रियेमुळे महसुली प्रणाली अधिक पारदर्शक झाली असून, करदात्यांचा विश्वासही वाढल्याचे प्रशासनाचे मत आहे. थकीत कर वसुलीस गती देण्यासाठी राबविण्यात आलेल्या ‘अभय योजने’अंतर्गत दंडाच्या रकमेवर ५० टक्के सवलत देण्यात आली होती. या योजनेचा लाभ सुद्‌धा मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला असून, त्यामुळे थकबाकी वसुलीत लक्षणीय वाढ झाल्याचे आकडेवारीतून दिसते.

याशिवाय, अद्यापही कर न भरलेल्या मालमत्ता धारकांविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमांनुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. एकूणच, नियोजनबद्ध उपाययोजना, सवलतीच्या योजना आणि निवडणूक काळातील वाढलेली करभरणा यामुळे महाड नगरपरिषदेच्या महसुलात यंदा उल्लेखनीय वाढ नोंदवली गेली.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त भांडुप परिमंडळातील गुणवंत कामगारांचा सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून महावितरण भांडुप परिमंडळात दरवर्षी प्रमाणे गुणवंत तांत्रिक कामगार यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.



भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी, वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंता (प्रभारी) माणिक राठोड, भांडुप परिमंडलाचे सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले) प्रवीण रहांगदळे, कार्यकारी अभियंता (प्रशा). श्रीनिवास चटलावार, ठाणे १ विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रमणी मेश्राम, भांडुप विभागाचे कार्यकारी अभियंता अप्पासो खांडेकर, वागळे इस्टेट विभागाचे कार्यकारी अभियंत सतीश जाधव, भांडुप परिमंडलाच्या प्रणाली विश्लेषक, सौ. कीर्ती जोशी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल व इतर वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

दरवर्षी १ मे रोजी जगभरात कामगार दिन साजरा केला जातो. मुख्य कार्यालयाच्या संकल्पनेतून या दिवशी महावितरणचा कणा मानला जाणाऱ्या तांत्रिक कामगारांचा सन्मान करतो. त्याप्रमाणे, भांडुप परिमंडलात प्रत्येक उपविभागातून एक लाईन स्टाफ व प्रत्येक विभागातून एक यंत्रचालक यांना त्यांच्या मागील वर्षाच्या चांगल्या कामाबद्दल मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी, आवर्जून त्यांच्या कुटुंबियांना सुद्‌धा बोलविण्यात आले होते. भांडुप परिमंडलात तिन्ही मंडळ मिळून एकूण १२ यंत्रचालक तर ४५ तांत्रिक कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना मुख्य अभियंता संजय पाटील यांनी पुरस्कार मिळालेल्या सर्व गुणवंत कर्मचाऱ्यांचे आणि त्यांच्या या यशामध्ये अमूल्य सहभाग देणाऱ्या त्यांचा कुटुंबीयांचेही आभार मानले.

# पनवेल महापालिकेत महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त आज १मे रोजी पनवेल महानगरपालिकेत ध्वजवंदनाचा समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सकाळी ७ वा. महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.



या कार्यक्रमास आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते अॅड प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच महापालिका सदस्य , अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, सहायक संचालक केशव शिंदे,उपायुक्त डॉ वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता संजय कटेकर, सहायक आयुक्त डॉ.रुपाली माने, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.तसेच विविध मान्यवर, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नितीन पाटील म्हणाले, ज्या पद्धतीने महाराष्ट्र राज्याने देशाच्या प्रगतीसाठी योगदान दिले आहे तसेच योगदान पनवेल महानगरपालिका महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि प्रगती मध्ये देत राहील असा मला ठाम विश्वास वाटतो.यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली. हुतात्मा स्मारक येथे ही महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन पनवेल येथील हुतात्मा स्मारक येथे आज स्वातंत्र्य सैनिकाचे उत्तराधिकारी अनिल वासुदेव आचार्य यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या कार्यक्रमास महापौर, आयुक्त यांच्यासह महापालिकेचे लोकप्रतिनिधी व अधिकारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# गव्हाण ग्रामपंचायत येथे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायतीमध्ये ६७ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त शुक्रवारी उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण सोहळा पार पडला. ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर प्रशासक महेश घबाडी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच पंचायत समितीचे माजी सदस्य हरिभाऊ पाटील, माजी सदस्य रतनप्रभा गव्हाण, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, तसेच सचिन घरत, हेमंत ठाकूर, अजय भगत, विश्वनाथ कोळी, वसंत म्हात्रे, हेमंत पाटील, अमृत भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीत गाऊन राज्याच्या प्रगतीसाठी एकजूट ठेवण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा केला.

# उरण येथे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते ध्वजारोहण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

१ मे महाराष्ट्र राज्य निर्मितीचा ६६ वा वर्धापन दिन संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उरण तहसील कार्यालयाच्या प्रांगणात 'महाराष्ट्र दिन' अत्यंत अभिमानाने आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.



या सोहळ्याप्रसंगी उरणचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते व तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले व राष्ट्रगीताने परिसर दुमदुमला. कार्यक्रमास वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानिफ मुलाणी यांच्या पोलिस पथकाने तिरंग्या ध्वजास मानवनंदना देण्यात आली.

याप्रसंगी उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे, उरण भाजप शहराध्यक्ष कौशिक शहा, उरण नगरपरिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती जसीम गॅस, इतर सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य तसेच उरण युवा अध्यक्ष निलेश पाटील, नवीन राजपाल, नायब तहसीलदार रविंद्र सानप, नायब तहसीलदार नरेश पेढवी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि उरणमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभर शासकीय कार्यालयांत ध्वजारोहण, पोलीस संचलन आणि शाळा–महाविद्यालयांमध्ये लावणीसारखे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले. उरण येथील कार्यक्रमात उरणचे आ. महेश बालदी व तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना वंदन केले व नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. 'सर्वधर्मसमभाव, एकात्मता आणि विकास' या मूल्यांवर चालत महाराष्ट्राला देशात अग्रेसर ठेवण्याचा संकल्प करण्यात आला.

# अपघातातील जखमी तरुणाच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्याने केली लंपास

**पनवेल : वार्ताहर**

अपघातानंतर गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल झालेल्या तरुणाच्या गळ्यातील सोनसाखळी बेशुद्ध अवस्थेचा फायदा घेत चोरट्याने लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शुद्धीवर आल्यानंतर गळ्यातील साखळी गायब झाल्याचे लक्षात येताच संबंधित तरुणाने तक्रार केली असून या प्रकरणी अखेर कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवीन पनवेल येथील सेक्टर ९ मधील रिद्धी अपार्टमेंटमध्ये राहणारा २४ वर्षीय तरुण दुचाकीवरून जात असताना अपघातग्रस्त झाला. या अपघातात तो गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडला. स्थानिकांनी तत्काळ त्याला कामोठे येथील महात्मा गांधी मिशन रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, तरुण बेशुद्ध अवस्थेत असल्याचा गैरफायदा घेत अनोळखी व्यक्तीने त्याच्या गळ्यातील सोनसाखळी चोरी केल्याचा आरोप आहे. काही वेळाने शुद्धीवर आल्यानंतर गळ्यातील साखळी नसल्याचे लक्षात येताच तरुणाला धक्का बसला. या सोनसाखळीचे वजन सुमारे १८ ग्रॅम असून तिची किंमत जवळपास दोन लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.



**पनवेल : राजिप शाळा कोपर येथे गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अनंताशेठ ठाकूर, बी.टी. कांबळे, भाऊशेठ भोईर, अॅड. रुपेश म्हात्रे, काशिनाथ पाटील, आनंदी घरत, अनुसया घरत, रंजना ठाकूर, इंदुबाई म्हात्रे व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कुल उलवे येथे आज दिनांक १ मे रोजी जागतिक महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे चेअरमन व नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.





या कार्यक्रमाला स्थानिक स्कूल कमिटीचे निलेश खारकर, कविता खारकर, राजेश खारकर, शैलेश घरत, धीरज ओवळेकर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके, स्कुल च्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, पालक प्रतिनिधी, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे चेअरमन परेश ठाकूर यांनी कामगार दिनाचे महत्त्व सांगताना समाजातील प्रत्येक कामगाराच्या योगदानाचे कौतुक केले. "कामगार हे राष्ट्राच्या प्रगतीचे खरे शिल्पकार आहेत," असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी कामगारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे सादर करून मान्यवरांचे मन जिंकले.

# तरुणी बेपत्ता

**पनवेल:** वार्ताहर मैत्रिणीकडेजावुन येते असे सांगून घरातुन गेलेली १८ वर्षीय तरुणी अद्याप पर्यंत घरी परत न आल्याने ती हरवल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

छवी मेहेरोलिया असे या तरुणीचे नाव असून वय १८ वर्षे, उंची ४ फुट ९ इंच, रंग सावळा, चेहरा गोल, अंगात नेसुस मेहेंदी रंगाचा टॉप, काळ्या रंगाची लेगीज, कानात सोन्याची बाळी असा पेहराव आहे. सदर तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोअं घाटे यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल : महाराष्ट्र राज्याच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक खांदा कॉलनी, येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कार्याध्यक्ष किशोर देवधेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी सामूहिक राष्ट्रगीत, ध्वजगीत व महाराष्ट्र गौरव गीत गाण्यात आले.**

# सीकेटी विद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर विद्यालयात (१ मे) 'महाराष्ट्र दिन' उत्साहात साजरा झाला. संस्थेचे सचिव डॉ. एस टी गडदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापक सुभाष मानकर, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका निरजा अधुरी, वैशाली पारधी, स्वाती पाटील,पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे तसेच संकुलातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेचे सचिव डॉ एस टी गडदे यांनी सर्वप्रथम सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या संस्थेने मागील ३० वर्षात केलेल्या प्रगतीमध्ये सर्व सेवकांनी केलेल्या परिश्रमाचे कौतुक केले. बदलत्या परिस्थिती नुसार सर्व शिक्षकांनी अपडेट राहिले पाहिजे असा संदेशही त्यांनी सर्व शिक्षकांना दिला.

संगीत शिक्षिका अर्चना पाटील आणि संगीत शिक्षक संतोष खरे व विद्यार्थी यांनी 'महाराष्ट्र गीत' सादर केले. विज्ञान विभागाच्या सहशिक्षिका अपर्णा मुकणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.सी के टी संकुलातील सर्व सेवकांच्या उपस्थितीत 'महाराष्ट्र दिन' अर्थात 'कामगार दिन 'उत्साहात संपन्न झाला.



# गव्हाण येथील विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस अर्थात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांचे संयुक्त विद्यमाने ध्जजारोहण संपन्न झाले.

विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या शुभहस्ते संपन्न झालेल्या या ध्वजारोहण सोहळ्यास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच विजयशेठ घरत, ज्युनिअर कॉलेज विभाग स्थानिक शाळा समितीचे सदस्य अॅड.राहुल घरत,एम.एन.एम.विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर तसेच ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख,कांतीशेठ घरत,मिनाक्षीताई पाटील,एम.एन.एम.विद्यालयाच्या प्राचार्या सायली वाडवळकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे,गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे,एम.एन.एम.विद्यालयाचे पर्यवेक्षक अरुण जोशी आदी उपस्थित होते.




**पनवेल : प्राथमिक आरोग्य केंद्र २, कोळीवाडा, उरण नाका रोड, पनवेल येथे महिलांच्या कॅन्सरच्या निदानाकरिता टाटा कॅन्सर हॉस्पिटल आणि येथील महानगरपालिकेचा वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्या कराराने तपासणी करण्यात आली.**



**पनवेल : नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र २ आणि ७चे वैद्यकीय अधिकारी डॉ. नेहा म्हात्रे, डॉ. अनमोल ठाकूर, पूर्ण स्टाफ आणि स्क्रिनिंग करण्यासाठी आलेले टाटा कॅन्सर हॉस्पिटल खोपोलीचे सिनिअर मेडिकल ऑफिसर आणि त्यांची संपूर्ण टीम.**


## संपादकीय

# एकमेकां साह्य करू!

जेव्हा समस्यांवर उपाय शोधण्याचे प्रामाणिक प्रयत्न यंत्रणांकडून केले जातात, तेव्हा थोडा संयम, काहीशी सहनशीलता आणि बराचसा समंजसपणा दाखवून समाजाने सहकार्य केल्यास समस्यांचे चटके सोसण्याचे सामूहिक बळ प्राप्त होत असते.

**जगणे सुसह्य व्हावे यासाठी कितीही नव्या सुविधा उपलब्ध केल्या, किंवा जुन्या सुविधांमध्ये कितीही सुधारणा केल्या तरीही काही समस्यांचा तिढा सुटतच नसेल तर सामाजिक अस्वस्थता वाढते. हे सहाजिकच असले तरी जेव्हा उपायांच्या सर्व मर्यादा संपतात तेव्हा समंजस सहनशीलतेने एकमेकांस सहकार्य करत समस्यांची तीव्रता कमी करण्यात शहाणपण असते. मुंबई आणि पुणे या महानगरांदरम्यानचा प्रवासाचा विलंब कमी व्हावा आणि प्रवास अधिक सुरक्षित व्हावा यासाठी निर्माण करण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचे दुतर्फा पदर वाढत्या वाहतुकीमुळे अपुरे पडू लागले आहेत. राज्यातील सर्वात वेगवान आणि दर्जेदार ठरलेला हा महामार्गदेखील वाढत्या रहदारीस तोंड देण्यासाठी अपुरा पडू लागला, आणि येथून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षांना धुमारे फुटू लागले. वस्तुतः या महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी आणि त्यातून होणारी गैरसोय हा सरकारी त्रुटींपेक्षाही, वाढत्या वाहनसंख्येचा व खाजगी प्रवासाच्या वाढत्या प्रवृत्तीचा परिणाम आहे. भविष्यात या महामार्गावरील वाहतूक किती वाढेल याचे त्या वेळी बांधलेले ठोकताळेदेखील चुकीचे ठरावे एवढ्या वेगाने मुंबई व पुणे महानगरांतील व राज्यातील वाहनांची संख्या भरमसाठ वाढत आहे. गेल्या वर्षभरात मुंबई परिसरातील वाहनांच्या संख्येत तब्बल तीन लाखांची भर पडली, तर संपूर्ण राज्यात सुमारे ३३ लाख नवी वाहने रस्त्यावर आली. या द्रुतगती महामार्गावर दररोज सुमारे ८० हजार वाहने येजा करतात, आणि सुट्ट्या किंवा सप्ताहाच्या अखेरीस ही संख्या लाखांच्या पलीकडे पोहोचते. अवजड वाहनांची बेशिस्त, खाजगी वाहनांकडून होणारे नियमांचे उल्लंघन अशा काही कारणांमुळे या मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली की सहसा तिचे रूपांतर समस्येत होऊन, कोणतीही समस्या सोडविण्याची जबाबदारी सरकारची असल्याच्या खात्रीमुळे या समस्येवरही सरकारनेच तोडगा काढावा अशी अपेक्षा व्यक्त होत असते. म्हणूनच सरकारने आपली जबाबदारी ओळखून या महामार्गावरील कोंडी होणाऱ्या भागास पर्याय ठरणारा 'मिसिंग लिंक' मार्ग महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर खुला केला. शुक्रवारी उद्घाटनाच्या कार्यक्रमादरम्यान पुन्हा प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागलेल्या अनेक वाहनधारकांनी सरकारला जबाबदार ठरवत नाराजी व्यक्त केलीच! मुंबई पुण्यातील रहिवाशांनी मेट्रो प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान अनेक गैरसोयी सहन केल्या. यामध्ये अनेकांना वैयक्तिक समस्यांनाही सामोरे जावे लागले असेल, पण हे प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आता त्या सहनशीलतेची गोड फळे सर्वांनाच मिळू लागली आहेत. द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक वाहतुकीसाठी खुली झाल्यानंतरही तोच अनुभव येणार आहे. अर्थात, वाढती गर्दी आणि वाढती वाहतूक ही सामाजिक समस्या असल्याने ती सामूहिकरीत्या सोडविण्यातच समंजसपणा असतो. मिसिंग लिंकचा मार्ग खुला झाल्यानंतर हा समंजसपणा जपला, तर महामार्गावरील प्रवासाचे सुख अनुभवता येईल. समस्या दूर करणे किंवा त्यांची तीव्रता कमी करणे ही सरकारची जबाबदारी असते, तसेच त्यासाठी सहकार्य करणे ही समाजाची जबाबदारी असते. मिसिंग लिंक मार्ग खुला करून सरकारने जबाबदारी पार पाडली आहे. आता समंजस सहकार्य करण्याची जबाबदारी समाजावर आहे. महाराष्ट्रातील जनता समंजस असल्याने ती जबाबदारी पार पाडेल यात शंका नाही.**

# 'टेक-वारी २.०'च्या माध्यमातून गतिमान प्रशासनाकडे वाटचाल






येत्या ४ ते ८ मे २०२६ या कालावधीत 'टेक-वारी २.०' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. खासगी क्षेत्र, शासन आणि नागरी समाज यामधील तंत्रज्ञ, धोरणकर्ते, कलाकार, आरोग्य-कल्याण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध विषयांचे तज्ज्ञ या वारीत प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षणात ६ हजार कर्मचारी प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. राज्यातील कोणताही शासकीय अधिकारी आणि कर्मचारी या प्रशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी राज्यभरातील नऊ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक सत्राचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. शासकीय अधिकारी-कर्मचारी यांची गुणवत्ता, कामातील दर्जा वाढविण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणाला विशेष महत्व आहे.

एप्रिल २०२६मध्ये २ ते १० एप्रिलदरम्यान आयोजित केलेल्या 'महा-साधना सप्ताह' या राज्यव्यापी प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत, ८.८ लाखांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासांचे संरचित प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये 'सार्वजनिक प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'सायबर सुरक्षेची मूलतत्त्वे', आयआयएम बंगळूरुद्वारे 'सार्वजनिक धोरणाची मूलतत्वे' आणि आयआयएम अहमदाबादद्वारे 'रणनीती व गेम थिअरी' या अभ्यासक्रमांची यादी नियोजनपूर्वक तयार करण्यात आली होती. या ७ दिवसांत, महाराष्ट्राच्या सरकारी कर्मचाऱ्यांनी तब्बल ३५ लाख तासांचे सखोल प्रशिक्षण पूर्ण केले. याची नोंद एका थेट डॅशबोर्डवर रिअल-टाइममध्ये नोंदविण्यात आली आणि क्षमता निर्माण आयोगाद्वारे (सीबीसी) सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे, हे आजचे प्रमुख आव्हान आहे. ते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही.

जगभरात यासाठी विविध उपाय राबवले जात आहेत. सिंगापूर आपल्या 'स्किल्सफ्युचर' मोहिमेद्वारे कौशल्यविकासावर भर देत आहे, तर संयुक्त अरब अमिराती संघीय संस्थांमध्ये मुख्य एआय अधिकाऱ्यांची नियुक्ती करत आहे. एस्टोनिया 'डिजिटल स्टेट अकॅडमी' राबवत आहे. या सर्व प्रयत्नांमागे एकच प्रश्न आहे, वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी मोठ्या सरकारी कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे? युनेस्कोने २०२५ मध्ये नमूद केले की, जगातील निम्म्याहून कमी देशांनी त्यांच्या ई-गव्हर्नमेंट धोरणांमध्ये एआयचा समावेश केला आहे. त्यामुळे जग अजूनही या क्षेत्रात मार्ग शोधत आहे आणि महाराष्ट्रही आपल्या परिस्थितीप्रमाणे या दिशेने वाटचाल करत आहे.

शासनातील तंत्रज्ञान आता केवळ बॅक-ऑफिसपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते फ्रंट ऑफिसचा भाग बनले आहे. 'डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण अधिनियम, २०२३' नुसार प्रत्येक विभागाला डेटा विश्वस्त म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते. डिजिलॉकर, उमंग, आधार आणि इंडिया स्टॅक यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे नागरिक-शासन संवादात मोठे परिवर्तन घडले आहे. एआय च्या वापराने तक्रार निवारण, अनुपालन देखरेख आणि सेवा वितरणाच्या पद्धतीत बदल घडत आहे, तर उदयोन्मुख क्वांटम कॉम्प्युटिंग येत्या काही वर्षांत सध्याच्या सायबर सुरक्षा प्रणालींसमोर नवे आव्हान उभे करू शकते. या बदलांची माहिती नसल्यास अधिकारी कामात मागे पडू शकतात. मात्र यात त्यांचा दोष नाही, कारण तंत्रज्ञान खूप वेगाने बदलत आहे. हीच दरी भरून काढण्यासाठी 'टेक-वारी' उपक्रम राबवला जात आहे. 'टेक-वारी २.०'चे वैशिष्ट्य म्हणजे हे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवणे.

या पाच दिवसांच्या कार्यक्रमात मंत्रालयात डिजिटल गव्हर्नन्स, डीपीडीपी कायदा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, क्वांटम कॉम्प्युटिंग, जनरेटिव्ह एआयचा प्रत्यक्ष अनुभव, सायबर सुरक्षा, प्रशासनातील नीतिमत्ता तसेच केंद्र सरकारच्या प्लॅटफॉर्म्स या विषयांवर तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

या कार्यक्रमात 'डिजिटल पेमेंट्स'विषयी 'एनपीसीआय'चे सीईओ, 'क्वांटम कॉम्प्युटिंग'विषयी आयबीएमचे सीटीओ तसेच 'एआय'विषयी 'नॅसकॉम'चे फ्रंटियर टेक्नॉलॉजी संचालक मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच संवाद, नेतृत्व आणि प्रशासकीय नीतिमत्ता या विषयांवरही सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. कर्मचारी विकासाला प्राधान्य देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्वतः तंत्रज्ञ असलेले मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात येत असून, तो राज्याच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

'टेक-वारी २.०' मागील संकल्पना केवळ तांत्रिक शिक्षणापुरती मर्यादित नाही. या पाच दिवसांत पाच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'तालरंग', 'नादरंग', 'योगरंग', 'कलारंग' आणि 'संस्कृतीरंग' असे पाच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तालरंगाद्वारे ढोलकीच्या माध्यमातून संघभावना वृद्धिंगत केली जाते, नादरंगातून संगीताच्या माध्यमातून तणावमुक्तीवर भर दिला जातो, तर योगरंगातून मन आणि शरीराच्या संतुलनावर लक्ष केंद्रित केले जाते. कलारंगामध्ये कला, एआय आणि प्रशासन यांतील संबंधांचा वेध घेतला जातो. तसेच, संस्कृतीरंगाद्वारे महाराष्ट्राच्या वारी परंपरेचे प्रतीकात्मक दर्शन घडवण्यात येते.

केवळ नियमांचे पालन करणारा प्रशिक्षित अधिकारी निर्माण करण्यापेक्षा, मानसिकदृष्ट्या सक्षम, सांस्कृतिकदृष्ट्या दृढ आणि व्यावसायिकदृष्ट्या आत्मविश्वासू असलेला सरकारी अधिकारी नागरिकांची अधिक चांगली सेवा करेल, या विश्वासावर या कार्यक्रमाची रचना आधारलेली आहे. तसेच, प्रगती ही मूल्यांवर आधारित असावी, यावरही या उपक्रमात भर देण्यात आला आहे.

'महा-साधना सप्ताह'दरम्यान नोंदवलेले ३५ लाख तासांचे प्रशिक्षण ही केवळ आकडेवारी नसून, त्यातून भविष्यात अधिक चांगले निर्णय, तक्रारींचे जलद निवारण आणि नागरिकांना अधिक सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या दिशेने अजूनही अनेक पावले उचलणे बाकी आहे. इतर राज्ये आणि देश या प्रवासाच्या काही टप्प्यांवर आपल्यापेक्षा पुढे आहेत आणि त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप काही आहे.

राज्याची दिशा स्पष्ट असून या उपक्रमाला गती मिळत असून त्यातून बांधिलकी जपली जात आहे. ज्याप्रमाणे वारकरी चालत राहतो, त्याच्या प्रवासासारखीच ही टप्प्याटप्प्याने पुढे जाणारी प्रक्रिया आहे. राज्याचा कर्मचारी वर्ग वारकऱ्यांप्रमाणेच या शिक्षण प्रवासात सहभागी होत आहे. शेवटी सांगायचं म्हणजे 'टेक-वारी २.०' हा शेवट नसून प्रशासनाच्या या शिकण्याच्या प्रवासातील पुढचा टप्पा मानला जात आहे.

(साभार : महासंवाद)



## बदलते तंत्रज्ञान

# भविष्यातील बदलते टेक्नोलॉजीचे जग

बटणाचा मोबाईल ते टच स्क्रीन स्मार्ट फोन, कॉम्प्युटर ते लॅपटॉप ते आता टॅबलेट कॉम्प्युटर असे बदल आपल्यासमोर झपाट्याने बदलत आहेत. टेक्नोलॉजीचे जग आता एका नव्या वळणावर आहे.



पुढील टेक्नोलॉजी कशी असेल, कोणते नवे मार्ग खुले होतील,कोणत्या संधी बाजारात उपलब्ध असतील,कोणत्या गोष्टीचे शिक्षण आपण भावी काळासाठी घेतले पाहिजे, कोणते उद्योगधंदे पुढील काळात चालतील याचा एक आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे.

मोबाईल हे भविष्यातील सर्व काम करताना लागणारे सहाय्यक मशीन म्हणून काम करेल. त्यासाठी त्याला जास्त क्षमतेचे प्रोसेसर्स असतील, जास्त मेमेरी असेल तसेच मोबाईल घरातील मशीनचा रिमोट कंट्रोलर म्हणून काम करेल. येत्या काळात बरेच आर्थिक व्यवहार हे मोबाईलच्या माध्यमातून होतील त्यामुळे पैसे, क्रेडीट कार्ड यापेक्षा मोबाईलचा वापर करून आर्थिक उलाढाल करण्यात लोकांचा कल राहील.


हे तंत्रज्ञान हळूहळू वाढत आणि बदलत असले तरी थोड्या वर्षांनी हे स्टेबल होईल व त्यातून रोबोटिक बेस्ड नवीन क्रांतिकारक तंत्रज्ञानाचा जन्म होईल. त्यात सॉफ्टवेअर क्षेत्रात आमुलाग्र बदल अपेक्षित आहेत. नवनवीन मोबाईल अप्लिकेशन लिहिणाऱ्या लोकांना वाव राहील. आपण विचार केला नसेल असे उद्योग मोबाईल अप्लिकेशनच्या रूपाने ऑनलाईन होतील.

या विभागातील प्रस्थापित कंपन्यांना स्पर्धा करून नवीन तंत्रज्ञान वापरणाऱ्या कंपन्या पुढे जातील. मोबाईलवर जास्तीत जास्त इंटरनेटवरील डाटा वापरला जाईल त्यामुळे डाटा पुरवणाऱ्या कंपन्यांमध्ये ज्याच्याकडे जलद डाटा पुरवण्याची क्षमता आणि तांत्रिक बाजू आहेत ती कंपनी पुढे मार्गक्रमण करेल.

लोकांच्या वाढत्या डाटाची मागणी व वेगवेगळ्या मार्गाने मिळणारे इंटरनेट यापुढेही जाऊन प्रत्येकाचा डाटा क्लाउडसारख्या एकाचा मोठ्या सर्व्हरमध्ये साठवला जाऊन गरज पडल्यास त्या व्यक्तीला पुरवला जाईल.

प्रत्येकाचे स्वतःचे अनेक मोबाईल सारखे उपकरणे असतील व अनेक मोबाईल बरोबर जोडले जाण्यासाठी क्लाउडचा वापर केला जाईल. याबरोबर मोबाईल सामर्थ्यवान बनतील. त्याचबरोबर त्यांच्या सुरक्षिततेचा व त्यातील माहिती गुप्ततेचा प्रश्न उपस्थित राहील.

# चित्रमहर्षी भालजी पेंढारकर



## निमित्त

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. त्यांचा जन्म २ मे १८९८ रोजी कोल्हापुरात झाला.

विविध टेक्नोलॉजीचा वापर सध्या चित्रपटांमध्ये सहजपणे चित्रपट निर्माते करतात, पण ज्या काळात केवळ नाटक अन् लोककलेमधून भारतातील लोकांचे मनोरंजन केले जात होते, त्याच काळात दादासाहेब फाळके यांनी चित्रपट निर्मितीचे तंत्र भारतात आणून भारतीयांना चित्रपटाची ओळख करून दिली. म्हणूनच दादासाहेब फाळके यांना 'भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक' असं म्हटलं जातं. चित्रपटनिर्मितीसाठी दादासाहेब फाळके यांनी सर्वस्व वाहिले होते. त्यांचे आयुष्य हेदेखील एका चित्रपटाप्रमाणेच होते. एखाद्या चित्रपटात एका नायकाच्या आयुष्यात जशी संकटं किंवा अडथळे येतात, त्याचप्रमाणे दादासाहेबांनादेखील त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागला होता.

चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुण वयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहू महाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करीत ते कोल्हापूरला परतले. भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले.

पुण्यातल्या 'लक्ष्मी' थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

लाईफ ऑफ ख्रिस्त हा मूकपट पाहिल्यानंतर दादासाहेब यांच्यामध्ये चित्रपट निर्मितीची आवड निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी राजा हरिश्चंद्र या मराठी आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या चित्रपटाची निर्मिती केली. राजा हरिश्चंद्र हा चित्रपट केवळ २० मिनीटांचा चित्रपट होता या चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्या नावानं भारतीय चित्रपसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार म्हणजेच दादासाहेब फाळके पुरस्कार हा कलाकारांना दिला जातो. दादासाहेब फाळके यांच्यावर हरिश्चंद्रची फॅक्टरी या चित्रपटाचीनिर्मिती देखील करण्यात आली आहे. या चित्रपटात त्यांचा जीवनप्रवास दाखवण्यात आला आहे. अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षीचे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## धूम्रपान करणं आरोग्यासाठी घातकच!

शरीरात काहीच चुकीचे संकेत न दिसणं म्हणजे शरीर आतून चांगलंच असेल असा समज पाळणं म्हणजे फार चुकीचं आहे. धूम्रपान करणं आरोग्यासाठी किती घातक असतं हे तर आपल्याला माहीत आहेच. हेल्थ एक्सपर्ट सतत लोकांना धूम्रपानाची सवय सोडण्याचा सल्ला देतात. इतकंच काय तर प्रत्येक सिगारेटच्या पाकिटावरदेखील 'सिगरेट इस इंज्युरिअस टू हेल्थ' असं ठळकपणे लिहिलेलं असतं आणि जळालेल्या फुप्फुसांचा फोटोही असतो.



तरीसुद्धा काही लोक सिगारेट ओढणं सोडत नाहीत. ही एक अशी सवय आहे जी सोडणं फारच अवघड मानलं जातं. बरं अनेकांना तर असंही वाटतं की, 'मी तर कितीतरी वर्षांपासून स्मोक करतो, पण मला कधी काही त्रास झाला नाही'. हा जरी मनाला दिलासा देणारा समज असला तरी डॉक्टरांचं यावर वेगळंच मत आहे. शरीरात काहीच चुकीचे संकेत न दिसणं म्हणजे शरीर आतून चांगलंच असेल असा समज पाळणं म्हणजे फार चुकीचं आहे. अनेकदा शरीराची ही शांतता, आता हळूहळू मोठी गडबड होत असल्याचा संकेत असते. आतल्या आत अनेक बदल होत राहत असतात. श्वसननलिका आतून हळूहळू आकुंचन पावतात. फुप्फुसांचा लवचिकपणा कमी होतो, रक्तवाहिन्या कठोर होऊ लागतात आणि शरीरात ऑक्सीजनचा फ्लो प्रभावित होतो. शरीर कोणत्याही संकेतांशिवाय वेदना आणि दबाव सहन करत असतं.

एक्सपर्ट सांगतात की, धूम्रपानाशी संबंधित आजार अचानक होत नाहीत, हळूहळू वाढतात. यात श्वासासंबंधी आजार, लंग्स कॅन्सर आणि हृदयरोग यांचा समावेश करता येईल. अनेकदा या आजारांची माहिती तेव्हा मिळते, जेव्हा शरीराचं आधीच खूप नुकसान झालेलं असतं.

सगळ्यात धक्कादायक बाब ही आहे की अनेकदा पहिला संकेतच फार गंभीर असतो, जसे की हार्ट अ‍ॅटॅक किंवा लकवा. लक्षणं समोर येईपर्यंत शरीराचं आतून फार नुकसान झालेलं असतं. हेच कारण आहे की, 'मी बरा आहे' हा विचार फार घातक आहे. त्यातल्या त्यात दिलासादायक बाब अशी ही आहे की, धूम्रपान सोडल्याने कोणत्याही वयात आपल्याला फायदा मिळत असतो.

काही दिवसांमध्येच हृदयाचे ठोके आणि ब्लड प्रेशर नॉर्मल होतं जातं. काही महिन्यात फुप्फुसांची काम करण्याची क्षमताही सुधारते आणि पुढे गंभीर आजारांचा धोकाही कमी होतो.

# माथेरान घाटरस्त्यात पुन्हा बिबट्याचे दर्शन

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नेरळ : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान घाट रस्त्यात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ३० एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घाट उतरत असलेल्या एका वाहनचालकाला हा बिबट्या दिसला. विशेष म्हणजे वाहन जवळ येताच बिबट्याने घाबरलेल्या अवस्थेत उडी घेत झाडीत धाव घेतल्याचे दिसून आले. या घटनेचा व्हिडीओही संबंधित वाहनचालकाने मोबाईलमध्ये कैद केला आहे.



चांगभले परिसरात आठवडाभरात बिबट्याचे हे दुसरे दर्शन असून काही दिवसांपूर्वीही एक बिबट्या वाहनासमोर धावताना आढळला होता. तसेच वॉटर पाईप परिसरातील रेल्वेमार्गाजवळील गुहेत बिबट्या बसल्याचे स्थानिक आदिवासी तरुणांनी पाहिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भागात एकच बिबट्या आहे की आणखी बिबटे वावरत आहेत याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, घाट परिसरात बिबट्याच्या वाढत्या हालचालींमुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### प्रशासनाचे आवाहन

**रात्रीच्या वेळी घाट रस्त्यावर अनावश्यक वावर टाळावा. वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवावे आणि बिबट्या दिसल्यास कोणतीही घाबरगुंडी न करता सुरक्षित अंतर राखून तत्काळ संबंधित यंत्रणेला माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.**

# कर्जतमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६वा वर्धापन दिन कर्जतमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काही शाळांमध्ये परीक्षांचे निकाल असल्याने तत्पूर्वी त्या शाळांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर विदयार्थ्यांना निकालपत्र देण्यात आले.



१ मे महाराष्ट्र दिनानिमित तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष संतोष पाटील, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नगरसेवक अशोक राऊत, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, रामदास गायकवाड, कुमेश मोरे, किशोर कदम, रोहित ओसवाल, नगरसेविका अरुणा वायकर, कोयल कन्हेरीकर, नेहा शिंदे, मानसी कानिटकर, राधिका पवार, माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, अतुल कडू, कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड, नवनाथ दाभाडे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उपविभाग पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, कर्जत पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल सोनाने, पंचायत समिती कार्यालयात सभापती नमिता घारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी गट विकास अधिकारी सुशांत पाटील, गट शिक्षण अधिकारी अनंत खैरे, रवींद्र घारे आदी उपस्थित होते. अभिनव ज्ञान मंदिर प्रशाले मध्ये शालेय समिती अध्यक्ष विनायक चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर विद्यालयात आदर्श शिक्षिका मेघा पिंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, मुख्याध्यपिका स्नेहा गाढे, श्रद्धा मुंढेकर आदी उपस्थित होते.

प्रशासकीय कार्यालयातील समारंभात आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, नायब तहसीलदार सचिन राऊत, मंडल अधिकारी संतोष जांभळे, माजी उपनगराध्यक्ष रामकृष्ण मोकल आदी उपस्थित होते.

# लोहारे शिवमंदिराच्या जीर्णोद्धाराचे भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

लोहारे येथील पुरातन स्वयंभू शिव मंदिराच्या जीर्णोध्दार कामाचा शुभारंभ मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. या भूमिपूजन सोहळयास पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री गोगावले यांनी, हे स्वयंभू शिवमंदिर श्रध्दास्थान असून या मंदिराच्या जीर्णोध्दारामुळे परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक समृध्द होणार आहे. मंदिर विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – उमरोली, तालुका – पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट क्रमांक/सर्व्हे नं. | उपविभाग/हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ४० | २ | जिरायत ० – ९१ – ८०<br>पो.ख. ० – १९ – २०<br>एकूण १ – ११ – ०० | २०.६९ |

वर वर्णन केलेल्या जमिनीचे संपूर्ण क्षेत्र १ –११ –०० हे. आर. चौ. मी. पैकी श्री. भगवान रामभाऊ मढवी यांचे अविभाज्य हिश्याचे एकूण क्षेत्र ० – ४७ – ०० हे. आर. चौ. मी., आकार ६.२७ रू. पैसे विक्री क्षेत्र ० – १६ – ०० हे. आर. चौ. मी.

पनवेल.
दिनांक : ०१/०५/२०२६.


सही/-
अॅड. जयवंत एकनाथ भोपी
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.


# मंत्री भरत गोगावलेंच्या हस्ते महाडमध्ये ध्वजवंदन

**महाड : प्रतिनिधी**

१ मे महाराष्ट्र दिनानिमित्त महाड येथील चांदे क्रीडांगण या ठिकाणी शासकीय ध्वजावंदन करण्यात आले. फलोत्पादन व रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजवंदन करून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

१ मे रोजी महाराष्ट्रदिना निमित्ताने राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास खात्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते महाड विभागीय शासकीय ध्वजावंदन करण्यात आले. महाडच्या चांदे क्रीडांगणावर



सकाळी ८ वाजता झालेल्या या ध्वजावंदन कार्यक्रमास मंत्री गोगावले यांच्यासह पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, महाडचे प्रांत अधिकारी पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, महाड शहर पोलीस निरीक्षक भोसले, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुर्वे, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, महाडचे व्यापारी तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी, पत्रकार बांधव, महाडकर, कर्मचारी उपस्थित होते. तसेच १ मे ते १५ मेपर्यंत 'मी माझी जनगणना केली' या सेल्फी पॉईंटचे मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी नागरिकांनी आपली स्वतःची जनगणना करण्यासाठी शासनाला जनगणना करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महाड तहसीलदार शितोळे यांनी नागरिकांना केले.


## जाहीर प्रसिद्धिकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२६–२७ ते २०३०–३१ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे. संस्थेचे नावः इंडिया रियालिटी ओपन प्लॉट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दिनांक ०३/०५/२०२६ ते ०७/०५/२०२६ नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक ०९/०५/२०२६, नामनिर्देशन माघारी दिनांक. १२/०५/२०२६ ते २६/०५/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान दिनांक. ३१/०५/२०२६ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालय इंडिया रियालिटी ओपन प्लॉट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड. किंवा निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय. साई शरण, ऑफिस नं.०८, प्लॉट नं १५, सेक्टर ०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१०२०६ कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री राजाराम शंकर गोळे
निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी
मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या वतीने इंडिया रियालिटी ओपन प्लॉट सहकारी गृहनिर्माणसंस्था मर्या. वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड.


# डॉ. सुजाता दाभाडकर आणि डॉ. मोहन मेथा यांना जीवनगौरव

**पोलादपूर : प्रतिनिधी**





डॉक्टर्स असोसिएशन ऑफ महाड या महाड, पोलादपूर, बिरवाडी येथील डॉक्टरांच्या संघटनेचे वार्षिक अधिवेशन नुकतेच महाड येथे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी विख्यात नेत्ररोगतज्ञ डॉ. सुजाता दाभाडकर व दासगावचे डॉ. मोहन मेथा यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

औपचारिक उद्घाटन समारंभ संघटनेचे अध्यक्ष डॉ.नितीन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष डॉ. स्वप्नील जाधव, खजिनदार डॉ.परेश महाडिक, सचिव सागर रहाळकर, सहखजिनदार रोहित पांचाळ, सहसचिव उदय खेडेकर, रायगड मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ.आदित्य महामूणकर, सायंटिफिक कमिटीचे प्रमुख डॉ. शेखर दाभाडकर व डॉ.राजेश शिंदे यांच्या उपस्थितीत धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने झाला. यानंतर प्रसिध्द नेत्ररोग तज्ञ डॉ.सुजाता दाभाडकर व दासगावचे डॉ.मोहन मेथा यांना त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक सेवेबद्दल जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्व.डॉ.नितीन कुद्रीमोती स्मरणार्थ सुरू केलेल्या बीजभाषणात डॉ. श्रीकांत रानडे यांचे अतिशय सुंदर व संस्मरणीय व्याख्यान झाले. या अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रात डॉ.जितेंद्र गव्हाणे, डॉ.अमित मिरजोलकर, डॉ.पुष्कर चिरमाडे, डॉ.एहेसान शेख, वसंत कुलकर्णी यांची वैद्यकीय विषयावर उदबोधक व्याख्याने झाली.

या कार्यक्रमातील मानपत्रांचे लेखन व वाचन डॉ. राजेश शिंदे यांनी केले तर या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. राजेश शिंदे, डॉ. सपना कुडतरकर, डॉ. प्रणाली महामूणकर, डॉ.श्रध्दा जाधव, डॉ. सारिका जोगदंड, अनघा सरकले यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. सागर रहाळकर यांनी केले.

# राजिपमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेत (राजिप) महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १) जिल्हा परिषद येथे ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जालिंदर पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे, महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता विनायक तेलंग, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता मोहन सरवदे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुनील भोपळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




## ग्रुप ग्रामपंचायत कशेळे ता. कर्जत जि. रायगड

### जाहिरात

**ग्रामपंचायत मानधन कर्मचारी पद भरती ( वर्ग-4 ) 2026**

ग्रुप ग्रामपंचायत कशेळे साठी खाली नमूद केलेल्या पदासाठी नव्याने मानधन तत्वावर पदभरती करण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे.

| पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | आवश्यक तांत्रिक अहर्ता | भरावयाच्या पदांची संख्या | प्रवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| घंटागाडी कर्मचारी | १० वी पास | Light Motor Vehicle (LMV) ड्रायव्हिंग लायसन्स | १ | पद आरक्षित नाही | १००००/- (दहा हजार मात्र) |

**अटी व शर्ती :-**

१. कर्मचारी भरतीचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधि करण तथा ग्रामपंचायत कार्यालय, कशेळे, ता. कर्जत जि. रायगड यांना असतील.
२. कर्मचारी भरतीसाठी अर्ज संबंधी सविस्तर माहीतीसाठी ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा.
३. **वयोमर्यादा** : १८ ते ३८ वर्षे
४. वाहन चालविण्याचा किमान **१ ते २ वर्षांचा अनुभव** असावा.
५. अर्जदार कशेळे स्थानिक ग्रामपंचायीमधील असणे आवश्यक)
६. **शारीरिक पात्रता** शारीरिकदृष्ट्या सक्षम (फिटनेस सर्टिफिकेट शासकीय रुग्णालय यांचा आवश्यक) दृष्टी (Vision) चांगली असणे आवश्यक
७. **तांत्रिक ज्ञान.** वाहनाचे प्राथमिक देखभाल (Basic Maintenance) माहिती असणे तसेच ब्रेक, इंजिन, हायड्रॉलिक सिस्टम याबद्दल मूलभूत समज आवश्यक.
८. **नियम व कायद्यांचे ज्ञान** वाहतूक नियमांचे ज्ञान
९. सुरक्षा नियमांचे पालन करण्याची सवय असणे आवश्यक

**इतर अटी**

१०. उमेदवाराचे चारीत्रय पडताळणी, (Police Verification) आवश्यक .
११. मद्यपान/नशा न करता वाहन चालविणे बंधनकारक
१२. **गावातील कचरा घंटागाडी द्वारे संकलन करणे साठी आवश्यक ते सर्व कामकाज. तसेच ग्रामपंचायत प्रशासन आदेशीत करेल ते सर्व कामे करणे आवश्यक राहील.**
१३. **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचे कडील पत्राद्वारे अंतीम मान्यता प्राप्त झालेचे नंतरच पात्र निवड झालेल्या उमेदवारास मानधन तत्वावर निवडपत्र दिले जाईल.**

अर्ज स्वीकारण्याचा अंतीम दि. १२.५.२०२६ पर्यंत राहील. कार्यालयीन वेळ १०.०० ते सायं ५.०० पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय कशेळे येथे स्वीकारले जातील.

सही/-
सतीश भा. चेंडके
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत कशेळे,
ता. कर्जत जि. रायगड

सही/-
उज्वला पी. भोसले
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत कशेळे,
ता. कर्जत जि. रायगड



## TENDER NOTICE

**INVITING OFFERS FROM COMPETENT PROJECT MANAGEMENT CONSULTANTS (PMC)**

Offers are invited from reputed and competent Project Management Consultants (PMC) for the proposed redevelopment of the existing building of:

Varadvinayak Cooperative Housing Society Ltd.
Plot No 1. Building No 1 to 5
Sector 14, New Panvel, Navi Mumbai.

**Property Details:**
- Prime location opposite K.A.Banthiya School
- Situated on 20-meter wide road
- Plot area admeasuring approximately 3,800 Sq. Mtrs.

**Existing Members Details:**
- 1 RK Flats: 120 Nos.
- 1 BHK Flats: 30 Nos.

**Cost of Tender Document:**
Rs. 25,000/- (Rupees Twenty-Five Thousand Only) (Non Refundable) By Demand Draft in favour of Varadvinayak Cooperative Housing Society Ltd.

**Eligibility Criteria:**
Interested PMCs are requested to verify the eligibility criteria from the Society Office before purchasing the tender document.

**Tender Issue & Submission Dates:**
From 3 May to 16 May 2026
Time : Between 6:00 PM to 8:00 PM
Venue : Office of Varadvinayak Cooperative Housing Society Ltd., Sector 14, New Panvel, Navi Mumbai.

Ananta Thakur : 9769617431/ Phanale 9819925652

**sd/-** **Hon. Secretary** **sd/-** **Chairman**
Varadvinayak Cooperative Housing Society Ltd.


# मुरुडमध्ये महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**मुरुड : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे १ मे रोजी मुरुड शहरातील अंजुमन इस्लाम जंजिरा एज्युकेशनल आवारात महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम देशभक्ती, सामाजिक जाणीव आणि श्रमिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात अंजुमन इस्लाम जंजिरा ऍग्री हायस्कूल व जुनिअर कॉलेज चे प्राचार्य वसीम सातारेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले. महाराष्ट्र गीत गायनानंतर विद्यार्थ्यांनी "जय महाराष्ट्र" च्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला. या समयी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा चे प्राचार्य डॉ. साजिद शेख, अंजुमन इस्लाम जंजिरा प्रायमरी उर्दू स्कूलच्या मुख्याध्यापिका रक्षणदा खतीब, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य वसीम सातारेकर व डॉ. साजिद शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "महाराष्ट्र दिन हा केवळ राज्य स्थापनेचा उत्सव नसून एकात्मता, विकास आणि अभिमानाचेदेखील प्रतीक आहे.

# महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण

## उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाच्या ६७व्या वर्धापन दिनानिमित्त, कोकण विभागाचे मुख्य ध्वजारोहण कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या हस्ते आज कळंबोली येथील नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



या प्रसंगी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.या समारंभास नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

समारंभात विविध पोलीस व आपत्कालीन सेवांच्या पथकांनी संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यामध्ये राज्य राखीव पोलीस दल क्र.११, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, नवी मुंबई पोलीस, महिला पोलीस, वाहतूक शाखा, अग्निशमन दल, पोलीस बँड पथक, श्वान पथक, बुलेट प्रुफ व बीडीडीएस वाहने, फायर रेस्क्यू बाईक, निर्भया पथक, आणि रस्ता सुरक्षा अभियान पथक आदींचा समावेश होता. प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत हे संचलन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

**उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव**

पोलीस उपअधिक्षक रमेश पंढरीनाथ भामे, पोलीस निरीक्षक सुनिल दत्तात्रय शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस उपनिरीक्षक रमेश आनंदा पाटील, सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र रघुनाथ राऊत, पोलीस हवालदार संजय बाळाराम तांडेल, पोलीस हवालदार सचिन साहेबराव शेवाळे, पोलीस हवालदार मच्छिंद्र उखा पवार, पोलीस हवालदार सचिन एकनाथ कडू , पोलीस नाईक अभय आत्माराम सांगळे तर सी सेवा पदक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम सुरेश नागरे, पोलीस नाईक पृथ्वीराज अजितसिंग घोरपडे या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकालावधीत त्यांनी केलेल्या विशेष कार्याबद्दल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्याहस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीसाठी अचूक व अद्यावत मतदार यादी असणे आवश्यक आहे यादृष्टीने राज्यात सध्या अर्थात मतदार यादीची विशेष सखोल पुनरावृत्ती मोहिम सुरु असून पनवेल महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या या मोहिमेचा शुभारंभ विभागीय आयुक्त श्रीमती अग्रवाल यांच्याहस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास अतिरिक्त विभागीय आयुक्त कोकण विभाग सिध्दाराम सालीमठ, अपर आयुक्त (सामान्य) श्रीमती फरोग मुकादम, सह आयुक्त (नियोजन) प्रमोद केंभावी, सहआयुक्त (पुर्नवसन) रवि पाटील, सहआयुक्त (करमणूक व शुल्क) रविद्र पवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ अधिकारी, आदी विविध शासकीय अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपद्वारे शिरवणेत महिला जनआक्रोश रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांविरोधात बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नारिशक्ती वंदन व महिला जनआक्रोश रॅलीचे गावदेवी चौक ते शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेजपर्यंत आयोजित करण्यात आली होती. या जन आक्रोश महिला पदयात्रेचे आयोजन भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉक्टर राजेश पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. या पदयात्रेमध्ये नवी मुंबई जिल्ह्याचे नवनिर्वाचित नवी मुंबई जिल्हा प्रभारी शशिकांत कांबळे यांनीदेखील सहभाग घेतला. याप्रसंगी भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉक्टर राजेश पाटील, निलेश पाटील, अभिजीत पेडणेकर, नगरसेविका डॉक्टर प्रणाली पाटील, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, माजी नगरसेवक निवृत्ती कापडणे, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी, "भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला होता. कॉंग्रेस व त्यांचे मित्रपक्ष हे केवळ महिलांसाठी काही करण्याचं ढोंग करतात. प्रत्यक्षात काही करत नाहीत. जनगणनेच्या नावाखाली या ठरावाला मंजुरी देणार नाही असं सांगण्यात आलं. २०२३ मध्ये सरसकट एकमताने त्या ठरावाला मंजुरी देण्यात आली होती. मात्र आता याला विरोध करण्यात येतोय. हा अन्याय महिला सहन करणार नाहीत, भाजप तो अन्याय होऊ देणार नाही. प्रसंगी रस्त्यावर उतरू. त्यासाठीच हा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. ज्यात अनेक महिला सहभागी झाला. भारतीय जनता पार्टीला महिला सर्वच क्षेत्रात त्याप्रमाणेच राजकारणातही सक्षम व्हायला हव्या आहेत", असे डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.




# पनवेलमध्ये भारतरत्न डॉ. आंबेडकरांचा १३५वा जयंती महोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५वा जयंती महोत्सव पनवेल शहरामध्ये संपन्न करण्यात आला.



या महोत्सवाची सुरुवात पनवेल शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मिरवणुकीने अतिशय जल्लोषामध्ये व हजारो भीमसैनिकांच्या उपस्थितीत झाली . सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. मिरवणुकीची सांगतात डॉ. पटवर्धन हॉस्पिटलच्या समोरील गुजराती शाळेच्या प्रांगणामध्ये संपन्न झाले. या ठिकाणी जाहीर सभेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला .

या कार्यक्रमांमध्ये सुप्रसिद्ध गायक रवी जाधव यांच्या ऑर्केस्ट्राने भीम गीतांचा अतिशय सुमधुर असा कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व उपस्थित भीमसैनिकांना भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल तालुका व पनवेल शहर आंबेडकरी अनुयायांच्या वतीने करण्यात आले होते. हा भीम जयंती महोत्सव संपन्न होण्याकरिता गावोगावी आमंत्रण पाठवून करण्यात आली होती.

या जयंतीचा संपूर्ण खर्च हा गावागावातील भीमसैनिकांनी दिलेल्या धम्म दानातून करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता ज्येष्ठ नेते नरेंद्र गायकवाड पनवेल , विजय गायकवाड पनवेल, महेश साळुंखे वडघर, सचिन कांबळे काळुंद्रे, सचिन रमेश कांबळे शिवकर, प्रवीण खंडागळे पोयंजे, ज्येष्ठ बौद्धाचार्य हिरामण जोशी गुरुजी विचुंबे, राहुल गायकवाड काळुंद्रे, नितीन कांबळे आदई यांनी गेले महिनाभर अतिशय परिश्रम घेउन भीम जयंती महोत्सव अतिशय उत्साहात यशस्वी केला.

# अटल सेतूजवळ डेब्रिज टाकणाऱ्या डंपरचालकांवर गुन्हा दाखल

**उरण : बातमीदार**

उरणमधील चिर्ले येथे डेंब्रिज टाकणाऱ्या मुंबई मधील दोन वाहन चालकांना प्रत्यक्ष जागेवर पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दिनांक २४ एप्रिल रोजी वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशानुसार सुरक्षा रक्षक तसेच भरारी पथक कारवाई गस्त करीत असताना कार्यकारी अभियंता राजीव कोलप यांच्या सुचने नुसार बेकायदेशीर डेंब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.



अटल सेतुजवळ ब्रिज जेथे संपतो त्याठिकाणी चिर्ले येथे डेब्रिज टाकणारे वाहण असल्याची माहीती प्राप्त झाल्या नंतर सदर डेब्रिज टाकणारे वाहनांवर कारवाई करा असे आदेश मिंळाल्यानतर अटल सेतु ब्रिज संपतो त्या ठिकाणी चिरले ता. उरण, जि. रायगड येथे १९:३० वा च्या दरम्यान भरारी पथक पोहोचले असता सिडकोच्या अधिसुचीत क्षेत्रातील जागेत डंपरमधील डेब्रीज टाकत असताना आढळून आले. सदर डंपर वरील चालकास भरारी पथकाने थांबवून त्यांचे नाव विचारले असता त्याने महेश बाबु कुंभार, वय ३१ वर्ष, रा. न्यु पारेख कंपाउंड बिल्डींग नं ११ बी, रूम नं १०३ लोखंडे मार्ग, गोवंडी मुंबई असे सांगितले तर दुसर्याने शकीर सज्जद अली वय २७ वर्ष, रा. शांतीनगर फरदोस कालनी, एसपी रोड, वडाळा मंबई असे सांगीतले. त्यांनतर भरारी पथकाने सदर ठिकाणी सुरक्षा जवान यांना बोलावून त्यांच्या मदतीने भरारी पथकाने सदर दोन ही डंपर जासई पोलीस चौकी येथे आणून उभे केले आहेत.

डेब्रीज अनाधिकृतपणे वाहतुक करून ये जा करणा-या तसेच स्थानिक लोकांच्या आरोग्यास व जिवीतास हानी होईल अशा बेकायदेशीर व बेजबाबदार पध्दतीने टाकून सिडकोच्या अधिसुचीत क्षेत्रातील जागेचे विद्रुपीकरण करण्यास बेजबाबदारीचे कृत्य करणेस कारणीभूत झाले म्हणून भरारी पथकाने चालकांवर गुन्हा नोंदविला आहे.

# विद्याभवन संकुलात महाराष्ट्र दिन साजरा



**नेरुळ : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात बेलापूर विभाग केंद्र समन्वयक रेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी , रेखा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विचार व्यक्त करताना आपल्या भाषणात रेखा पाटील यांनी शिक्षण, शिस्त आणि सहाय्यता या तीन प्रमुख बाबींवर विशेष भर दिला. आपल्या जीवनातील अनेक अनुभव सांगून त्यांनी सर्व शिक्षकांना नम्रता आणि शिस्त बाळगण्याचे आवाहन केले. शिक्षकांनी नेहमी नवनवीन गोष्टी शिकत रहावे. एकमेकांना नेहमी सहकार्य करावे. क्षेत्र कोणतेही असो कठीण परिश्रमास पर्याय नाही असे सांगीतले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिक्षकांचा गौरव करण्यात आला.प्रा. सुजय वाबळे कल्पना सोनार, राखी लोणकर यांनी महाराष्ट्र दिनाचा इतिहास आपल्या भाषणातून व्यक्त केला. प्राथमिक मराठी विभागातील शिक्षकांनी सुंदर मराठी गीत सादर केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी चौधरी यांनी केले.

# सेंट मेरीज स्कूलचा स्पार्क आर्चरी समर कॅम्प यशस्वी

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील स्ट. मेरीज आयसीएसई शाळेत आयोजित 'स्पार्क' आर्चरी समर कॅम्पचा रविवार, ३ मे रोजी यशस्वी समारोप होत आहे. एप्रिल २७ पासून सुरू झालेल्या या कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.



हा उपक्रम एमओसीसीबी समूहाच्या वतीने राबविण्यात आला. कॅम्पचे प्रशिक्षण पनवेल येथील द्रोण आर्चरी मुकेश गुरडले यांनी दिले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शिस्त व समन्वय कौशल्यांचा विकास झाला. फादर जॉन मॅथ्यू यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साही प्रतिसादाचे कौतुक करत, अशा क्रीडा उपक्रमांद्वारे सर्वांगीण विकास साधण्याचा एमओसीसीबी समूहाचा प्रयत्न असल्याचे सांगितले.या यशस्वी आयोजनामुळे भविष्यात अधिक क्रीडा उपक्रमांना चालना मिळणार आहे.

# भाजप नवनिर्वाचित नवी मुंबई जिल्हा प्रभारी शशिकांत कांबळे यांचा दौरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शशिकांत कांबळे यांची भाजपा नवी मुंबई जिल्हा प्रभारी पदी नियुक्ती झाल्या नंतर प्रथमच नवी मुंबईत भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांची नेरूळ येथे गुरुवारी भेट घेतली.यावेळी जिल्हाध्यक्ष यांनी प्रभारी शशिकांत कांबळे यांचे स्वागत केले . यावेळी भाजप मंडळ अध्यक्ष, आजी- माजी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी झालेल्या बैठकीत डॉ. राजेश पाटील आणि प्रभारी शशिकांत कांबळे यांनी भाजप पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले. यावेळी नगरसेविका डॉ. प्रणाली पाटील, माजी नगरसेविका शिल्पा कांबळे, एस. सी. मोर्चा अध्यक्ष सुभाष गायकवाड, निलेश म्हात्रे, ज्येष्ठ भाजपा पदाधिकारी विजय घाटे, अभिजित पेडणेकर, युवक अध्यक्ष निकेतन पाटील, परिवहन समिती सदस्य राजेश राय आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित प्रभारी शशिकांत कांबळे यांनी सांगितले की, भारतीय जनता पार्टीचं संघटनात्मक काम आणि पक्ष वाढवण्यासाठी नियोजन असते. या दोन्ही बाबत जिल्हा आणि प्रदेशच्या मध्ये जो दुवा असतो तो म्हणजे प्रभारी. नवी मुंबईत भाजपचे ६५ नगरसेवक असून नवी मुंबई भाजपची संघटनात्मक रचना आधीपासूनच मजबूत आहे असे सांगितले प्रत्येक कार्यकर्ता चांगले काम करीत आहे, परंतु ते काम करत असताना मार्गदर्शनाची गरज आहे.

# परंपरेपासून ट्रेंडकडे हरवत चाललेला पारंपरिक लग्नसोहळा आणि चुकत असलेला मुहूर्त...!

**नवी मुंबई : बातमीदार**

चैत्रवैशाख महिना सुरू झाला की कोळी-आगरी समाजात लग्नसराईला उत्साहाची खरी सुरुवात होते. आनंद, आपुलकी आणि पारंपरिक रुढींचा सुंदर संगम असलेले हे लग्नसोहळे समाजाच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देतात. साखरपुड्यापासून हळदी, वरमाई आणि वरातीपर्यंत प्रत्येक विधीमध्ये खास पारंपरिक रंग पाहायला मिळतो. काळानुरूप या सोहळ्यांमध्ये नवे ट्रेंडही सामील झाले आहेत, मात्र या बदलांसोबत वेळेचं भान मात्र काही प्रमाणात हरवत चालल्याचं चित्र दिसत आहे.



भारतीय संस्कृतीत कोणत्याही शुभ कार्यासाठी 'मुहूर्त' अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. लग्नाचा दिवस आणि वेळ ठरवताना विशेष काळजी घेतली जाते. पण अलीकडच्या काळात मेहंदी, प्री-वेडिंग फोटोशूट, ब्रायडल मेकअप, विविध पोशाख आणि सोशल मीडियासाठी खास क्षण टिपण्यावर अधिक वेळ दिला जातो. परिणामी, ५.३० वाजता असलेला मुहूर्त अनेकदा ७-८ वाजेपर्यंत पुढे ढकलला जातो. यामुळे संपूर्ण लग्नसोहळ्याचं वेळापत्रक विस्कळीत होतं. लग्नानंतर पुन्हा रिसेप्शनसाठी वेगळी तयारी, फोटोसेशन यासाठी तासन्तास खर्च होतो. पाहुण्यांना वाट पाहून कंटाळा येतो आणि अनेकदा ते निघून जातात. शेवटी वरात मध्यरात्रीनंतर किंवा पहाटेच्या सुमारास निघते. काही ठिकाणी तर वरात पहाटे ४ ते ६ वाजेपर्यंत पोहोचल्याची उदाहरणंही समोर आली आहेत.

पूर्वीच्या परंपरेनुसार, "सुन ही घरची लक्ष्मी" मानली जात असल्यामुळे वरात मध्यरात्रीपूर्वीच घरी यावी, असा समज होता. संध्याकाळच्या सुमुहूर्तात लक्ष्मीचं आगमन होतं, या श्रद्धेवर आधारित ही प्रथा होती, मात्र आजच्या बदलत्या जीवनशैलीत ही भावना मागे पडताना दिसते.

यासोबतच एक महत्त्वाचा सामाजिक मुद्दाही समोर येतो. मध्यरात्री किंवा पहाटे वाजत-गाजत निघणाऱ्या वरातींमुळे परिसरातील नागरिक, जेष्ठ व्यक्ती, रुग्ण, तसेच अभ्यास करणारे विद्यार्थी यांना त्रास सहन करावा लागतो. आनंद साजरा करताना इतरांच्या सोयीचाही विचार होणं तितकंच आवश्यक आहे.

उशिरा निघणाऱ्या वरातींची काही प्रमुख कारणे :ठरलेल्या मुहूर्तावर लग्न न लागणे,कार्यक्रम वेळेपेक्षा दोन-तीन तास उशिरा सुरू होणे, धार्मिक विधींपेक्षा दिखावा आणि सोशल मीडियाला अधिक प्राधान्य, मेकअप, एंट्री, फोटोशूट यावर अधिक वेळ खर्च, लग्नानंतर रिसेप्शनसाठी वेगळी तयारी, फॅमिली आणि स्टेज फोटोसेशनमुळे वाढलेला विलंब हे चित्र बदलण्यासाठी फार मोठे प्रयत्न आवश्यक नाहीत. थोडंसं नियोजन, वेळेचं भान आणि परंपरांना योग्य मान दिल्यास लग्नसोहळे अधिक सुंदर, शिस्तबद्ध आणि सर्वांसाठी आनंददायी होऊ शकतात.

आनंद साजरा करताना समाजाचं भान ठेवणं हीच खरी परंपरा आहे. बदलत्या काळासोबत नवीन गोष्टी स्वीकारताना आपल्या संस्कृतीतील मूल्यं जपणंही तितकंच गरजेचं आहे. समाजहिताचा विचार करून प्रत्येकाने याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास, आनंदाचा ठरेल...!

# बांठिया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळींचा सेवानिवृत्ती गौरव

**पनवेल : वार्ताहर**

सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीच्या फक्त कोपरा विद्यालय(खारघर) आणि बांठिया माध्यमिक विद्यालय व एन.एन.पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालय,नवीन पनवेल येथे ३४ वर्षे मुख्याध्यापक म्हणून सेवा बजाविलेले सन्माननीय भगवान शिवदास माळी हे ३१ मे २०२६ रोजी नियत वयानुसार सेवानिवृत्त होत आहेत.त्यांच्यासोबत त्यांच्या सौभाग्यवती रेखा माळी या ८ वर्षे अगोदर स्वेच्छानिवृत्ती घेत आहेत.शाळांच्या उन्हाळी सुट्टीमुळे हा समारंभ सोहळा २७ आणि २८ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला.शेकडो हितचिंतक मित्रांनी,सहकाऱ्यांनी, आप्तेष्ट आणि नातेवाईकांनी माळी सरांच्या विषयीच्या आपल्या मनातील भावनांना मोकळी वाट करून दिली.

कोपरा हायस्कूलमध्ये सलग २५ वर्ष आणि बांठीया कॉलेजमध्ये सलग ९ वर्षे त्यांनी सेवा दिली.महाराष्ट्र मुख्याध्यापक महासंघाच्या रायगड शाखेचे सलग दोन वेळा अध्यक्ष राहिलेल्या माळी सरांचे अनमोल मार्गदर्शन रायगड शिक्षण खात्यात येणारा प्रत्येक अधिकारी घेत असल्याचे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या भाषणात जाहिरपणे सांगितले.



# महाराष्ट्र आणि देशाच्या उभारणीत कामगारांचे मोलाचे योगदान

## मंत्री आदिती तटकरे यांचे अलिबागेत प्रतिपादन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उद्यमशील, पुरोगामी, व्यावहारिक आणि कठोर परिश्रम करणारे नागरिक ही महाराष्ट्राची मोठी शक्ती असून शेतकरी, मजूर, औद्योगिक कामगार, बांधकाम क्षेत्रातील कामगार तसेच विविध सेवा क्षेत्रातील कष्टकरी बांधव यांच्या परिश्रमामुळेच विकासाची गती कायम राहत असून महाराष्ट्राच्या आणि देशाच्या उभारणीत कामगारांचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67व्या वर्धापन दिनानिमित्त महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान येथे आयोजित समारंभात राष्ट्रध्वज फडकविण्यात आला व राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले. यावेळी त्यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, उप वनसंरक्षक राहुल पाटील यांसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचे गायन केले. ध्वजवंदनानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली तसेच राष्ट्रगीत, राज्यगीत आणि ध्वजगीत सादर करण्यात आले.

पोलीस दल, राज्य राखीव पोलीस बल, वाहतूक शाखा, गृहरक्षक दल, गुन्हे शाखेचे श्वान पथक, पोलीस दलाचे डायल 112 पोलीस वाहन, दंगल नियंत्रण वाहन, जलद प्रतिसाद पथक, अग्नीशमन दल, वैद्यकीय सेवेच्या डायल 108 सेवेतील वाहन आदींनी यावेळी संचलनात भाग घेतला.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्र ओळखला जातो. त्यांनी स्वराज्य, सुशासन आणि लोककल्याणाची जी संकल्पना रुजवली, ती आजही आपल्या विकासाच्या वाटचालीला दिशा देणारी आहे. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अशा अनेक महान विभूतींनी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून महाराष्ट्राला प्रगत राज्य बनविण्याचा पाया घातला.

वेग, सुरक्षितता आणि आधुनिक अभियांत्रिकीचा संगम असलेला मुंबईपुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक' हा खऱ्या अर्थाने विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग आहे. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद केली आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (23.5 मीटर) असून लोणावळा तलावाच्या 180 मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी 650 मीटर केबल–स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (182 मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत रुंद बोगदा म्हणून नोंद झाली आहे. मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ सुमारे 30 मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास सुरळीत होईल व इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे 1 कोटी रुपयांची बचत होईल.

राज्याचा महत्वकांक्षी प्रकल्प म्हणजे रेवसरेड्डी सागरी महामार्ग (MS SH–04) हा महाराष्ट्राच्या किनारपट्टीला समांतर धावणारा सुमारे 540 कि.मी. लांबीचा महत्त्वाकांक्षी महामार्ग असून तो रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन किनारी जिल्ह्यांना जोडतो. या प्रकल्पामुळे वेळेची बचत,पर्यटन विकास आणि आर्थिक व शाश्वत विकास शक्य आहे. या महामार्गामुळे श्रीवर्धन, गणपतीपुळे, गुहागर आणि मालवण यांसारखी पर्यटनस्थळे थेट जोडली जाऊन पर्यटनाला चालना मिळेल. तसेच कोकणातील आंबा, काजू व मासळीच्या वाहतुकीला वेग मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल आणि गोवा व मुंबई यांच्याशी संपर्क अधिक जलद व सुलभ होईल.

जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 809 ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छतेत सातत्य राखले जात असून 1 हजार 830 गावांपैकी 1 हजार 718 गावे ODF Plus म्हणून विकसित करण्यात आली आहेत. घनकचरा, सांडपाणी आणि प्लास्टिक व्यवस्थापनासाठी लोकसहभागातून विविध उपक्रम राबविले जात आहेत.



### जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणातही ध्वजारोहण

***महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उप वनसंरक्षक राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) डॉ.रवींद्र शेळके, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रवींद्र राठोड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) नितीन वाघमारे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीकांत गायकवाड, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सुनील इंदलकर, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी निलेश लांडगे, तहसीलदार (महसूल) चंद्रसेन पवार, तहसीलदार गोविंद वाकडे आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.***

# उमटे धरणातील गाळ काढण्याची जि.प. सदस्य राऊळ यांची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उमटे धरण गाळाने भरले असून कित्येक वर्ष गाळ न काढल्याने पाणी लवकर संपते, परिणामी पाण्याची तिव्र समस्या उमटे धरणावर अवलंबून असलेल्या गाव व वाडयांवर निर्माण होते, तरीही उमटे धरणातील गाळ काढण्यात यावा तसेच निधी उपलब्ध करावा, अशी मागणी चौल गट जिल्हा परिषद सदस्य म्हणून डॉ. सचिन राउळ यांनी अलिबाग येथील जिल्हा नियोजनाच्या जिल्हा विकास समन्वय व संनियत्रंण दिशा आढावा सभेत उपस्थितांसमोर केली.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण दिशा समितीची आढावा सभा खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच खासदार सुनील तटकरे यांच्या सहअध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजीत करण्यात आली होती. या सभेत आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती रसिका केणी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रूपाली सातपुते, उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी गाळ काढून घेण्यात यावा, असे म्हटले. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एव्हढा निधी गाळ काढण्यासाठी शक्य नाही असे सांगितले. यावेळी आमदार महेंद्र दळवी यांनी गाळ काढणे गरजेचे असून त्यासाठी सिएसआर फंड निधीची तरतूद केली पाहिजे, असे विचार मांडले. दरम्यान, जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी पावसाळा येत आहे त्यापूर्वीच गाळ काढावा. त्यासाठी तरतूद करण्यात यावी, अशी मागणी केली.

चौल जिल्हा परिषद गटातून डॉ. सचिन राउळ हे पहिल्यांदा निवडून गेले आहेत. जिल्हा नियोजनाचा सभेत उमटे परिसरातील वाडावस्ती, गावे तसेच चौल जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या रेवदंडा, चौल, वरंडे व नागाव तसेच आक्षी ग्रामपंचायतीत उमटे धरणातील पाणी पुरवठा तसेच जानेवारी व मे महिन्यात निर्माण होत असलेली पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येचा मुद्दा उपस्थित करून येथील लोकांच्या मनातील प्रश्नाला वाचा फोडली. नवनिर्वाचीत जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी उमटे धरण पाणी पुरवठा, तसेच गाळ व स्थानिकांचा पाणी प्रश्न जिल्हा नियोजन समितीपुढे मांडल्याबद्दल स्थानिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

# द.ग. तटकरे महाविद्यालयात उद्योजकता व पेटंटिंगवर कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात 'इनक्युबेशन व स्टार्टअप समिती' आणि आयक्युएसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 30 एप्रिल रोजी "उद्योजकता आणि बौद्धिक संपदा हक्क (IPR) : पेटंटिंगद्वारे संशोधनाचे उत्पन्नात रूपांतर" या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या कार्यशाळेला सुमारे 60 विद्यार्थ्यांनी व अभ्यासकांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

महाविद्यालयात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेचे प्रयत्न उल्लेखनीय ठरत आहेत. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांनी प्रास्ताविकातून पेटंटिंग, संशोधन आणि स्टार्टअप संस्कृतीचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आयक्युएसी समन्वयक डॉ. जयशंकर आर. पांडेय यांनी भूषवले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात अजय सी. जाकळे, प्रा. उमेश काकडे आणि प्रा. स्मिता सानप यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअपच्या विविध संधी, निधी उभारणीची प्रक्रिया आणि रोजगारक्षम कौशल्यांबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी पेटंटिंगची संपूर्ण प्रक्रिया, संशोधनातून आर्थिक उत्पन्न मिळविण्याचे मार्ग आणि स्टार्टअप इकोसिस्टममधील संधी अत्यंत सोप्या आणि समजण्यास सुलभ भाषेत उलगडून सांगितल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्रा. उर्मिला खोब्रागडे यांनी, तर आभार प्रदर्शन सहा. प्रा. शश्वती महाडिक यांनी केले. समारोप प्रसंगी सर्व सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी इनक्युबेशन समितीच्या प्रमुख सहा. प्रा. आयशा बडे, सहा. प्रा. देवांक परब, सहा. प्रा. सुष्मिता महामुणकर, सहा. प्रा. अंकिता म्हस्के, सहा. प्रा. मंजिरी सावंत, सहा. प्रा. तेजस ओवाळ, सहा. प्रा. अश्विनी शेलार, सहा. प्रा. तेजस्विनी आचार्य, सहा. प्रा. दीपेश केकाणे, श्वेता सकपाळ तसेच सहा. प्रा. शश्वती महाडिक यांनी विशेष परिश्रम घेतले. काळुराम मधुकर पालकर यांनीही आयोजनात मोलाची मदत केली. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेबाबत नवीन दिशा मिळाली असून संशोधनाचे व्यावसायिक रूपांतर करण्यासाठी प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिंदल विद्या मंदिरात मंडला आर्ट कार्यशाळा



**मुरूड :** जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे पालकांसाठी आयोजित करण्यात आलेली 'मंडला आर्ट' कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कला आणि मानसिक स्वास्थ्य यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शाळेच्या कला प्रयोगशाळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेचा उद्देश पालकांमधील सर्जनशीलता विकसित करणे तसेच दैनंदिन तणावातून काही क्षण निवांत अनुभव देणे हा होता. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.।कार्यशाळेचे नियोजन कला विभागप्रमुख अर्चना तोडणकर यांनी केले. त्यांनी मंडला कलेची वैशिष्ट्ये, विविध रचनाशैली आणि चित्रनिर्मितीच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन केले.

# महाराष्ट्र दिनानिमित्त रोह्यात ध्वजारोहण

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील विविध शासकीय कार्यालय, सामाजिक संस्था कार्यालय या ठिकाणी महाराष्ट्र दिनानिमित्ताने ध्वजारोहण करण्यात आले.



छाया : जुगल दवे.

रोहा अष्टमी नगर परिषद येथे नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, निता हजारे, रवी चाळके, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

रोहा तहसील कार्यालय येथे प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांनी ध्वजारोहण केले. यावेळी तहसीलदार किशोर देशमुख, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, सदस्य किसन मोरे, जगन्नाथ धनावडे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, पोलीस उपनिरीक्षक पवार, नायब तहसीलदार राजेश थोरे, पुंडलिक मोकल, वैशाली काकडे, उज्ज्वला अंधारे, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग आदी उपस्थित होते.

रोहा पंचायत समिती येथे सभापती विजया पाशिलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपसभापती संजय मांडलुस्कर, सदस्य किसनराव मोरे, जगन्नाथ धनावडे, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी दिनेश वारगे, विस्तार अधिकारी, दिलीप पाबरेकर, नरेश भोईर, माहेश्वरी मोहरे आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# रोहा पालिकेतील अधिकारी रचना पार्टे सेवानिवृत्त

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेमध्ये विविध विभागात काम करून गेली 34 वर्षे प्रामाणिकपणे, नम्रपणे, सेवा बजावणाऱ्या रचना राजेंद्र पार्टे सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यानिमित्ताने रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने निरोप समारंभ नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.



यावेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, निता हजारे, नगरसेविका गौरी बारटक्के, स्नेहा आंबरे, स्वप्नील धनावडे, नगर परिषदेचे उदयनाथ ठाकरे, सुधीर भगत, निवास पाटील, मनोज पुळेकर आदी उपस्थित होते.

रचना पार्टे यांनी 34 वर्षे प्रवास सोपा नव्हता. या प्रवासात असलेल्या मुख्य अधिकारी यांचे मार्गदर्शन, सगळ्यांचा पाठिंबा व लोकप्रतिनिधींचा विश्वास यामुळे हा प्रवास शक्य झाल्याचे सांगितले.

समिर शेडगे यांनी तुमचे काम बोलतेय, संयमी व्यक्तीमत्व, प्रत्येक खात्यात चांगले काम असल्याच्या भावना व्यक्त केल्या. महेश कोलाटकर यांनी त्या जुन्या काळातील बीएससी असून त्यांनी चांगल्या रित्या वेगवेगळे खाते सांभाळले आहेत. महेंद्र दिवेकर यांनी गेली 34 वर्ष निस्वार्थ व निष्ठेने सेवा बजावली आहे. त्यांचा सल्ला व मार्गदर्शन नेहमीच मोलाचे ठरल्याचे सांगितले.

यावेळी सभापती नीता हजारे व स्नेहा अंबरे, निवास पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांचा संदेश यावेळी वाचून दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज पुळेकर यांनी केले.

# मुंबई–मडगावदरम्यान दोन अतिरिक्त गाड्या! कोकणवासीयांना दिलासा

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या मागणीची दखल घेऊन मध्य रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस–मडगावदरम्यान 2 अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालविणार आहे. मुलांना उन्हाळी सुट्टी पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात कोकणात लोक आपल्या गावी जात आहेत. त्यामुळे बसेस व ट्रेन भरून जात आहेत. या अतिरिक्त गाडीमुळे कोकणवासीयांना दिलासा मिळणार आहे.



लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष (2 सेवा) गाडी क्रमांक 01003 उन्हाळी विशेष गाडी 04.05.2026 (सोमवार) रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून 08.20 वाजता सुटेल व मडगाव येथे त्याच दिवशी 22.40 वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक 01004 उन्हाळी विशेष गाडी 03.05.2026 (रविवार) रोजी मडगाव येथून 16.30 वाजता सुटेल व लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी 06.20 वाजता पोहोचेल. या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

गाडी क्रमांक 01003 साठी विशेष शुल्कासह आरक्षण 02.05.2026 पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.अनारक्षित डब्यांसाठी तिकिटे सामान्य दराने UTS प्रणालीद्वारे उपलब्ध राहतील. प्रवासी तिकिट बुकिंगसाठी RailOne ॲपदेखील डाउनलोड करू शकतात. गाड्यांच्या स्थानकांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# 'आरसीएफ'तर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ प्रकल्प यांच्यातर्फे नंदाई एडुटेक फाऊंडेशनच्या सहकार्याने कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्या साधून आदिवासी विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले.

"स्वप्नांची चाके आदिवासी मुलांना सायकल वाटप" हा उपक्रम आर.सी.एफ. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, कुरुळ कॉलनी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी सायकल वाटप करण्यात आले. आरसीएफच्या निगमित सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत सायकल वाटप करण्यात आले. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला गती देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, नंदाई एडुटेक फाऊंडेशनच्या डॉ. भगवती नंदा नंदगिरी उपस्थित होते. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, संघटनांचे प्रतिनिधी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सायकली विद्यार्थ्यांसाठी केवळ वाहतुकीचे साधन नसून त्यांच्या स्वप्नांना नवे पंख देणारी एक महत्त्वाची पायरी आहे.



# गुजरातची बंगळुरूवर एकतर्फी मात



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सच्या संघाने गत चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला पराभवाचा धक्का दिला. पहिल्यांदा फलंदाजी करताना बंगळुरूचा संघ १५५ धावांवर ऑलआउट झाला होता. गुजरात संघाने चार विकेट्स आणि २५ चेंडू राखून सामना खिशात घातला.

शुबमन गिलने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतल्यावर जेकब बेथल आणि विराट कोहली या जोडीने आरसीबीच्या डावाची सुरुवात केली. जेकब बेथल अवघ्या पाच धावा करून माघारी फिरला. विराट कोहलीने दुसऱ्या षटकात रबाडाला सलग पाच चौकार मारून आक्रमक फलंदाजीचा नजराणा पेश केला, पण तिसऱ्या षटकात १३ चेंडूत २८ धावांवर रबाडानेच त्याच्या खेळीला ब्रेक लावला.

सलामीवीर माघारी फिरल्यावर देवदत्त पडिक्कलने आश्वासक आणि दमदार खेळी करताना २४ चेंडूत केलेल्या ४० धावा आणि कर्णधार रजत पाटीदारने १५ चेंडूत १९ धावा करत संघाचा डाव सावरणारी खेळी केली. अखेरच्या षटकात रोमारिया शेफर्ड १७ (१५), व्यंकटेश अय्यर १२ (१५) आणि भुवनेश्वर कुमारने १५ चेंडूत केलेल्या १५ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर बंगळुरू संघाने १९.२ षटकात सर्व बाद ११५ धावा केल्या. गुजरातकडून अर्शद खान याने सर्वाधिक तीन, राशीद खान आणि जेसन होल्डरने प्रत्येकी दोन आणि मोहम्मद सिराज आणि कगिसो रबाडाने प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना शुभमन गिलने २००पेक्षा अधिकच्या स्ट्राईक रेटसह फलंदाजी करताना १८ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४३ धावांची खेळी करत संघाला दमदार सुरुवात करुन दिली. साई सुदर्शनच्या रूपात भुवनेश्वर कुमारने आरसीबीला पहिले यश मिळवून दिले. पॉवर प्लेमध्ये भुवीनेच आक्रमक अंदाजात फटकेबाजी करणाऱ्या गिलच्या खेळीला ब्रेक लावला. त्याचा झेल टिपल्यावर विराट कोहलीने एकच जल्लोष केल्याचे पहायला मिळाले.

सलामीची जोडी तंबूत परतल्यावर १९ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांसह ३९ धावांवर खेळणाऱ्या जोस बटलरला भुवीने क्लीन बोल्ड केले, पण तोपर्यंत सामना आरसीबीच्या हातून निसटला होता. जेसन होल्डर १० चेंडूत १२ धावा करून परतल्यावर राहुल तेवतिया २७ (१७) आणि राशीद खान ७ (६) जोडीने १६व्या षटकातील पाचव्या चेंडूवर मॅच संपवली.

अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा

# आता रंगणार बाद फेरीच्या लढती

**मुंबई : प्रतिनिधी**

बंड्या मारूती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम, युवा पलटन, मुंबई बंदर या महाराष्ट्रातील संघा बरोबरच दक्षिण मध्य रेल्वे, ओएनजीसी, जयपूर पिंक क्लब, भारतीय नौदल या इतर राज्यातील संघानी बाद फेरी गाठली. बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

मुंबईतील ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटच्या एका क्रीडांगणावर झालेल्या तिसऱ्या दिवशी ब गटात मुंबईच्या भारत पेट्रोलियम संघाने दक्षिण मध्य रेल्वेला ५३-५२ असे चकवित गट विजेते म्हणून बाद फेरी गाठली, तर रेल्वेने उपविजेते म्हणून बाद फेरी गाठली. जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्या पेट्रोलियमने आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात दोन लोण देत ३२-२१ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात अतिसावधपणा त्यांच्या अंगाशी येणार होता, पण एका गुणाच्या फरकाने ते विजयी झाले. उत्तरार्धात रेल्वेने आपला



खेळ उंचावत सामन्यात कमबॅक केला, मात्र त्यांना निसटता पराभव स्वीकारावा लागला. उत्तरार्धात केलेले सहा बोनस पेट्रोलियमच्या विजयात कामी आले. अनिल जस्ता यांने २५ गुण मिळवीत या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्याला योगेश दहिया याने सहा पकडी करीत मोलाची साथ दिली. रेल्वेच्या आयन लोचन यांने चढाईत २२ गुण घेत, तर आशु सिंग याने चार पकडी करीत त्याला उत्तम साथ दिली.

ओएनजीसीने युवा पलटन (इंशोअरकोट प्रा. लि.)चा ३८-३७ असा पराभव केला. तरी गुण फरकातील आकड्यामुळे या गटात युवा पलटन विजेते, तर ओएनजीसी उपविजेते म्हणून गटातून बाहेर पडले. विश्रांतीला २३-२१ आघाडी घेणाऱ्या ओएनजीसीने नंतर सावध खेळ करीत हा निसटता विजय मिळविला. ओएनजीसीच्या या विजयात विजयने १२ गुण मिळवित, तर अंकित दहिया याने चार पकडी घेत महत्वाची भूमिका बाजावली. पेट्रोलियमच्या किशोर जाटने चढाईत १६ गुण घेत शेवटच्या क्षणापर्यंत निकराची झुंज दिली. सामन्यात बेशिस्त वर्तन केले म्हणून ओएनजीसीच्या चिंटू व संघप्रशिक्षक यांना पंचानी हिरवे कार्ड दाखविले.

जयपूर पिंक क्लबने ड गटात रेड आर्मीला ४१-१५ असे नमवित गट उपविजेते म्हणून बाद फेरी गाठली. मध्यंतराला २८-१० अशी मोठी आघाडी घेणाऱ्या जयपूरने शेवटी हा सामना सहज खिशात टाकला. देवांक दलाल याने चढाईत १३ गुण मिळवीत, तर आयुष कुमारने चार पकडी घेत हा विजय सोपा केला. रेड आर्मीच्या मोहित देगवाल याचा या सामन्यात प्रभाव पडला नाही. या गटात युनियन बँकेने गट विजेता म्हणून अगोदरच बाद फेरी गाठली. भारतीय नौदालाने मुंबई बंदर संघाचा ५३-४५ असा पाडाव केला. नौदलाने या सामन्यात पहिल्या डावात दोन, तर दुसऱ्या डावात एक लोण देत आपला विजय साकारला. नौदलाच्या विजयात तीन अव्वल पकड महत्वाच्या ठरल्या. नौदलाचा हिमांशू या विजयात चमकला. मुंबई बंदरच्या लोकेशने उत्तम बचाव करीत डावा सावरण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. युपी योद्धाने तामीळनाडू क्लबला १६-०९ असे पराभूत करीत बाद फेरीत आपली जागा पक्की केली.

युवा पलटन (इनशोअरकोट प्रा. लि.), ओएनजीसी, भारत पेट्रोलियम, दक्षिण मध्य रेल्वे, भारतीय नौदल, मुंबई बंदर, युनियन बँक, जयपूर पिंक क्लब, तामिळनाडू स्टेट, युपी योद्धा या संघानी बाद फेरी गाठली. जयपूर पिंक क्लब विरुद्ध तामिळनाडू क्लब, तर मुंबई बंदर विरुद्ध युपी योद्धा असे उपउपांत्यपूर्व फेरीचे सामने व त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीचे सामने होतील.

# कर्जतमधील ४३ तायक्वांदोपटूंना 'यलो बेल्ट'

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोसरी-तिवरे जिल्हा परिषद शाळेतील ४३ विद्यार्थ्यांनी तायक्वांदोमध्ये यलो बेल्ट मिळविला आहे. त्यांना गेल्या वर्षभरापासून चिल्ड्रन तायक्वांदो युनियन इंडिया ही संस्था मोफत शिक्षण देत आहे.



या शाळेचे मुख्याध्यापक नितीन थळे यांच्या संकल्पनेतून शाळेतील विद्यार्थ्यांना विशेषकरून विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी एखादे प्रशिक्षण मिळावे म्हणून त्यांनी चिल्ड्रन तायक्वांदो युनियन इंडियाचे अध्यक्ष शिवराम मकवाना यांच्याशी संपर्क केला. त्यांनी लगेचच विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्याचे मान्य केले.

या शाळेत गरीब, आदिवासी विद्यार्थीसुद्धा शिक्षण घेत आहेत. वर्षभराच्या प्रशिक्षणानंतर मकवाना यांनी विद्यार्थ्यांची चाचणी घेतली. त्यामध्ये ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी सात मुलांनी विशेष प्रविण्य मिळविले. यामध्ये चार मुली आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांना यलो बेल्ट देण्याच्या सोहळयास आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे पत्रकार विजय मांडे, चिल्ड्रन तायक्वांदो युनियन इंडियाचे अध्यक्ष शिवराम मकवाना, मुख्याध्यापक नितीन थळे, अनिल गट, अनिता सदगिर आदी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांना यलो बेल्ट आणि प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# 'स्विंग किंग' भुवनेश्वर कुमारने रचला नवा इतिहास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या आयपीएल २०२६च्या ४२व्या सामन्यात भारताचा 'स्विंग किंग' भुवनेश्वर कुमार याने नवा इतिहास रचला. जसप्रीत बुमराहला जे जमले नाही तो डाव साधत तो टी-२० तील टीम इंडियाचा नंबर वन गोलंदाज ठरला आहे.

गुजरात टायटन्सविरुद्ध धावांचा बचाव करताना भुवीने २८ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. या कामगिरीसह जगातील सर्वात मोठ्या स्टेडियमवर त्याने पर्पल कॅपवर पुन्हा कब्जा करताना टी-२० क्रिकेटमध्ये ३५० विकेट्सचा टप्पा पार केला. अशी कामगिरी करणारा भारताचा तो पहिला जलदगती गोलंदाज ठरला आहे. ३२५ सामन्यातील ३२४ डावात त्याने हा आकडा गाठला आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय खेळाडूंमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम युझवेंद्र चहलच्या नावावर आहे. चहलने आतापर्यंत ३९१ विकेट्स घेतल्या आहेत. त्यापाठोपाठ भुवीचा नंबर लागतो. क्रिकेट जगतात गाजावाजा असलेला जसप्रीत बुमराह या यादीत ३४७ विकेट्स घेत तिसऱ्या स्थानावर आहे.

**टी-२० क्रिकेटमध्ये ३५० विकेट्सचा टप्पा केला पार**



# सचिन तेंडुलकरच्या 'त्या' एका कृतीने जिंकली मने!

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

आपल्या खेळाने जगभरातील कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकणारा



खेळाडू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर नम्र व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखला जातो. नुकताच आंध्र प्रदेशातील एका कार्यक्रमात सचिनमधील संस्कारांची प्रचिती पुन्हा एकदा आली. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

विशाखापट्टणम येथील आंध्र विद्यापीठाच्या शताब्दी सोहळ्याला विशेष पाहुणा म्हणून सचिन उपस्थित होता. यावेळी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी सचिनला भगवान व्यंकटेश्वराची मूर्ती भेट म्हणून दिली. मूर्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने आपले बूट (शूज) काढले आणि अत्यंत आदराने नतमस्तक होऊन मूर्तीचा स्वीकार केला.

धार्मिक प्रसंगी आदर व्यक्त करण्याच्या परंपरेचे पालन सचिनने यावेळी केले. सचिनच्या या कृतीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून त्याच्या जमिनीवर असलेल्या स्वभावाचे आणि नम्रतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दोन श्रीलंकन युवा क्रिकेटरना अटक

**कोलंबो : वृत्तसंस्था**



श्रीलंकेची राजधानी कोलंबोतील नाराहेनपीटा परिसरात एका हॉटेलमध्ये एक लाजिरवाणी घटना घडली आहे. श्रीलंकेच्या अंडर-१९ संघातील दोन खेळाडूंनी हॉटेल रूममधील महिलांचे अंघोळ करतानाचे व्हिडीओ आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद केले. ही घटना उघड होताच पोलिसांकडून दोन्ही खेळाडूंना अटक करण्यात आली आहे.

हॉटेलमध्ये थांबलेल्या महिलांकडून तक्रार करण्यात आली होती की, बाथरूममध्ये असताना मोबाईल कॅमेऱ्यातून त्यांचे व्हिडीओ शूट करण्यात येत होते. महिलांनी तक्रार करताच दोन्ही खेळाडूंना ताब्यात घेण्यात आले आहे. माध्यमातील वृत्तानुसार दोन्ही खेळाडूंना आता कोठडीत ठेवल्यानंतर आता प्रत्येकी पाच लाख श्रीलंकन रुपयांच्या जामिनावर सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नाराहेनपीटा पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# ऑलिम्पिकसाठी भारताचा संभाव्य क्रिकेट संघ चर्चेत

## युवा खेळाडूंचा बोलबाला; वैभव, प्रियांश, अभिषेक शर्यतीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या देशभरात आयपीएलचा थरार रंगात असून प्रेक्षकांसाठी हा हंगाम अधिकच रोमांचक ठरणार आहे. या आयपीएलमधील कामगिरीच्या जोरावर २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी भारताचा १५ सदस्यीय संभाव्य संघ आतापासूनच चर्चेत आला आहे.

ऑलिम्पिकसाठी निवडल्या जाणाऱ्या संघात युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याचे नाव अग्रक्रमाने घेतले जात आहे. अवघ्या १५ वर्षांच्या वैभवने आयपीएल २०२६मध्ये ४०० धावांचा टप्पा ओलांडणारा पहिला फलंदाज ठरण्याचा मान मिळवला असून सध्या 'ऑरेंज कॅप'वर त्याचेच वर्चस्व आहे. त्याची ही अफाट क्षमता पाहता बीसीसीआय निवड समिती त्याला ऑलिम्पिकच्या मैदानात उतरवण्याची दाट शक्यता आहे.



याचबरोबर प्रियांश आर्य आणि अभिषेक शर्मा यांची बॅटही या स्पर्धेत आग ओकत आहे. पहिल्या चेंडूपासून आक्रमक पवित्रा घेण्याची क्षमता असलेल्या या जोडीसोबतच तिसऱ्या क्रमांकाची जबाबदारी यष्टीरक्षक फलंदाज ईशान किशनवर सोपवली जाऊ शकते. गेल्या सहा महिन्यांतील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ईशानने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले असून त्याचा फॉर्म असाच राहिल्यास ऑलिम्पिकचे तिकीट त्याला नक्कीच मिळू शकते.

२०२८च्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय संघाचे कर्णधारपद अनुभवी सूर्यकुमार यादवकडे सोपवले जाण्याची शक्यता आहे. सूर्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अलीकडेच टी-२० विश्वचषक २०२६चे जेतेपद पटकावले आहे. विशेष म्हणजे, त्याच्या नेतृत्वाखाली भारताने अद्याप एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. जरी सध्याच्या आयपीएल हंगामात सूर्याच्या बॅटमधून धावा निघत नसल्या, तरी त्याच्या नेतृत्वावरील विश्वास कायम असल्याने निवड समिती त्याच्या नावाचा गांभीर्याने विचार करत आहे.

**असा आहे संभाव्य संघ**

अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, प्रियांश आर्य, ईशान किशन, संजू सॅमसन, सूर्यकुमार यादव (कर्णधार), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, प्रिन्स यादव, वरुण चक्रवर्ती.

# रोहित शर्माने वाढदिवशी सुरू केला नवा ब्रँड

**मुंबई : प्रतिनिधी**

हिटमॅन रोहित शर्माचा ३९वा वाढदिवस गुरुवारी (दि.३०) होता. जगभरातून रोहितवर चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. यादरम्यान हिटमॅनने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत नवीन ब्रँड लाँच केला आहे. रोहितने नेहमीप्रमाणेच आपल्या खोडकर खेळकर मजेशीर अंदाजात नवा ब्रँड सुरू केल्याची आनंदाची बातमी दिली.

रोहित शर्माने हायड्रेशन ड्रिंकचा नवा ब्रँड सुरू केला आहे. या ब्रँडचं नाव हायड्रो ३६५ hydRO३६५ असं ठेवण्यात आलं आहे. आज वाढदिवसादिवशी म्हणजेच ३० एप्रिल २०२६ रोजी रोहितने हा ब्रँड लाँच केला आहे. हा ब्रँड 'ॲडव्हान्स्ड हायड्रेशन'वर लक्ष केंद्रित करतो आणि त्याची



टॅगलाइन आहे "पाणी पुरेसं नाही" (Water Is Not Enough). यापूर्वीच त्याने त्यांच्या 'आरएस बाय ट्रू एलिमेंट्स' (RS by True Elements) या हेल्थ फूड लाइनसाठी ट्रू एलिमेंट्ससोबत भागीदारी केली आहे.

रोहित शर्माने व्हीडिओ शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलं, "मी नेहमीच मानतो की उत्तम कामगिरीची सुरुवात मूलभूत गोष्टींपासून होते. त्यात हायड्रेशन (शरीरातील पाण्याचे संतुलन) ही एक महत्त्वाची बाब आहे, पण आपल्यापैकी बहुतांश जण ही गोष्ट चुकीच्या पद्धतीने करतो, कारण फक्त पाणी पुरेसं नसतं! दिवस सुरू होण्याआधीच सुमारे ७५% लोक डिहायड्रेटेड असतात. हीच समस्या लक्षात घेऊन मी hydRo तयार केलं आहे, जो हा बदल घडवून आणण्यासाठी आहे."

"दिवसभरातील प्रत्येक टप्प्यासाठी आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स.सोपं, प्रभावी आणि दररोज १००% देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी उपयुक्त! @hydro३६५. official आता लाईव्ह आहे आणि हे तुमचंच आहे," असं रोहितने शेवटी कॅप्शनमध्ये लिहिलं.

hydRo३६५ हा ब्रँड लाँच केल्यानंतर रोहित आता अशा भारतीय खेळाडूंच्या वाढत्या गटात दाखल झाला आहे, जे केवळ ब्रँड एंडोर्समेंटपुरते मर्यादित न राहता स्वतःचा ब्रँड उभे करत आहेत.

# आम्ही खराब खेळलो -हार्दिक पांड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

'दवाचा मुद्दा फार मोठा नव्हता. हैदराबादच्या फलंदाजांनी उत्तम फटके खेळले. आम्ही वाईट चेंडू टाकले. एकूणात आम्ही खराब खेळलो', अशी स्पष्ट कबुली मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने दिली.



मुंबईने रायल रिकलटनच्या शतकी खेळीच्या बळावर २४३ धावांचा डोंगर उभारला होता, मात्र सनरायझर्स हैदराबाद संघाने आठ चेंडू आणि सहा विकेट्स राखून हे लक्ष्य किरकोळ ठरवले. या मानहानीकारक पराभवानंतर गुणतालिकेत मुंबईचा संघ नवव्या स्थानी आहे. आठपैकी मुंबईला केवळ दोन सामन्यात जिंकता आले आहे. प्रत्येक पराभवागणिक प्ले ऑफच्या आशा मावळत चालल्यात. हार्दिकने सामन्यानंतर बोलताना काय चुकले या संदर्भात भावना मांडल्या.

हार्दिक म्हणाला, आम्ही डावपेच आखले होते पण गोष्टी तशा घडल्या नाहीत. शेवटचे तीन चेंडू सोडले तर बाकी माझी गोलंदाजी चांगली झाली. आमच्यासाठी हा हंगाम अशाच पद्धतीचा आहे. संधी मिळते, त्याचे सोने करायला हवे. आम्ही संधी वाया दवडल्या. जेव्हा असे होते तेव्हा जिव्हारी लागते. चाहते आम्हाला भरभरून पाठिंबा देतात, पण यंदाच्या हंगामात त्यांनी कौतुक करावे असे आम्ही खेळलेलो नाहीत. गोलंदाजांवर खापर फोडणार नाही, हे आमचे एकत्रित अपयश आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com